शनिवार, २४ जून २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२८१
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • SATURDAY 24 JUNE 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-281 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5

**चर्चेतली बातमी**

## सुरेखा पुणेकर यांचा बीआरएसमध्ये प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** प्रसिद्ध लोककलावंत आणि लावणीसम्राज्ञी सुरेखा पुणेकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला रामराम केला आहे. सुरेखा यांनी राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी देत हैदराबादच्या भारत राष्ट्र समितीत प्रवेश केला. तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या उपस्थितीत सुरेखा पुणेकर यांनी काल (२२ जून) पक्षप्रवेश केला. गेल्या काही दिवसांपासून अनेक कलाकार हे राजकीय पक्षात प्रवेश करताना दिसत आहेत. आपल्या घुंगरांच्या तालावर सगळ्यांना नाचवणाऱ्या आणि सौंदर्याने सगळ्यांना घायाळ करणाऱ्या लोकप्रिय नृत्यांगणा सुरेखा पुणेकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला रामराम करत दुसऱ्या पक्षात प्रवेश केला आहे. त्यामुळे सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला.सुरेखा पुणेकर यांनी काही वर्षांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात मोठ्या धुमधडाक्यात प्रवेश केला होता. पण आता दोन दिवसांपूर्वीच त्यांनी हैदराबाद येथील भारत राष्ट्र समिती या पक्षात प्रवेश केला. तेलंगणाचे मुख्यमंत्री के.सी. राव यांच्या बीआरएस पक्षात सुरेखा यांनी प्रवेश केला आहे. सुरेखा पुणेकर या दोन दिवसांआधीच हैदराबादमधील डेरे येथे दाखल झाल्या होत्या. त्यानंतर त्यांनी अनेक भेटीगाठीही घेतल्या होत्या. सुरेखा यांनी काही दिवसांपूर्वी विधानसभा निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यामुळेच त्यांनी बीआरएसमध्ये पक्षप्रवेश केल्याचे सांगितले जाते.

## अवैध वाळूउपसा न थांबल्यास जल आंदोलन करण्याचा ग्रामस्थांचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**परतुर :** परतूर तालुक्यातील गोळेगाव गोदावरी नदीपात्रातून दिवसरात्र होणारी अवैध वाळू चोरी गावकऱ्यांच्या मुळांवर आली आहे.गावातून बैलगाड्या व ट्रॅक्टर द्वारे बिनबोभाट वाळू उपसा होत आहे.वाळू माफियांनी गावांतील मुख्ये रस्ते खराब करून टाकले असून भरघाव वेगाने वाहने शाळेसमोर जात असल्याने नागरिकांसह शाळकरी मुलांचे अपघात होण्याची शक्यता आहे.गावातील नागरिकांना व शाळकरी मुलांना रस्त्यावर जाणे येणे कठिण करून टाकलेल्या गोळेगाव येथील संतप्त नागरिकांनी तहसील कार्यालय परतूर गाठून निवेदन देत अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्यांविरोधात कारवाई करावी, अन्यथा गावांतील गोदावरी नदीपात्रात जल आंदोलन करण्याचा इशारा दिला.

गोळेगाव येथील गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू उपसा करणाऱ्यांनी कहर केला आहे. महसूल व पोलिस यंत्रणेला न जुमानता ही वाळू चोरी दिवसरात्र सर्रासपणे सुरू आहे. दिवसरात्र वाळू उपसा चालू असल्यामुळे धुळीमुळे नागरिकांना आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्याचप्रमाणे भरघाव वेगाने शाळेसमोर अवैध वाळू वाहतूक करणारे धावत असल्यामुळे नागरिकांना व मुलांच्या अपघातांचा धोका निर्माण होत आहे. हे वाळू माफिया आसपासच्या परिसरातील व गावांतील असल्याने त्यांना विरोध केल्यास जीवे मारण्याची धमकी देत आहे.

तसेच अवैध वाळू उपसा हा काही महसूल व पोलीस अधिकाऱ्यांच्या संगनमताने होत असल्याचा दावा केला गेला आहे. विशेष म्हणजे प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या नाकावर टिच्चून वाळू चोरी होत आहे हे अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर कारवाई करावी अन्यथा २५/०६/२०२३ रविवारी सकाळी ११:०० वाजता येथील गोदावरी नदीपात्रात जल आंदोलन उभारण्याचा इशारा दिला आहे. जल आंदोलनादरम्यान काही जीवित हांणी झाल्यास यास महसूल व पोलीस प्रशासन जबाबदार राहतील असे निवेदनात म्हटले आहे. या निवेदनात ज्ञानेश्वर गुंजकर, गणेश गुंजकर, कृष्णा घुंगासे, लक्ष्मण तौर, धोंडीराम बिजोले, पंडित घुंगासे, लक्ष्मीबाई सोपान बिजोले, लक्ष्मीबाई शामराव बिजोले व इतर गावकऱ्यांच्या सह्या निवेदनात करण्यात आले आहे.


# दिंडोरीकरांच्या माथी बिबट्यांची दहशत किती दिवस?

## संतप्त जनतेचा संबंधित खात्याला सवाल

आधुनिक केसरी न्यूज

बंडू खडांगळे

**लखमापूर :** दिंडोरी तालुक्यात सध्या विविध भागात व गावांमध्ये बिबट्यांची दहशत मोठ्या प्रमाणावर निर्माण झाल्याने नागरिकांच्या भुवया उंचावल्या असून बिबट्यांचा बंदोबस्त झाला नाही तर रस्त्यावर उतरण्याची वेळ येईल.यांच्या परिणामांला सर्वश्री त्या विभागाचे संबंधित खाते जबाबदार राहील.असा संतापजनक सुर सध्या दिंडोरी तालुक्यातील विविध भागातील नागरिकांमधून निघत आहे. दिंडोरी तालुक्यात जवळपास २०१३-१४ पासून बिबट्यांचा वावर मोठ्या प्रमाणावर होत गेल्याने आता दिंडोरी तालुका बिबट्यांचे एक प्रकारे माहेरघर झाले की काय? असे म्हणण्याची वेळ दिंडोरीकर जनतेवर आली आहे.अगोदर च्या काळात या भागात बिबट्यांचा वावर होता .परंतु तो अतिशय दुर्मिळ.परंतु




२०१४ ते २०२३ पर्यंत बिबट्यांने या भागात आपल्या उग्र रुप दाखवत आपली दहशत निर्माण केली आहे. त्यामध्ये बिबट्यांने अनेकांवर हल्ले करून जखमी केले. तर काहीचा बळी पण घेतला आहे. तर अनेक गावांतील वाड्यावस्तीमधील गाई, वासरे, शेळ्या, मेंढरे, कुत्रे यांवर बिबट्यांने प्राणघातक हल्ले करून ताव मारला आहे. त्यामुळे वाड्यावस्तीमधील कुत्र्याच्या संख्या कमी करून टाकली आहे. त्यात म्हेळुसके, लखमापूर, परमोरी, निळवंडी येथे काही दिवसांपूर्वी बिबट्यांने ह्ले करून बळी घेतले आहे. त्यामुळे बिबट्यांच्या या दहशतीमुळे तालुक्यातील समस्त जनतेमध्ये आता संतापाची लाट उसळण्यास सुरुवात झाली आहे. आता सर्वत्र शाळा सुरू झाल्याने सकाळी व संध्याकाळी वाड्यावस्तीकडे जाण्या -येण्यासाठी विद्यार्थी वर्गाची मोठी धावपळ अथवा गर्दी दिसून येत असते. परंतु सध्या तालुक्यातील बहुतेक भागात बिबट्यांची दहशत.निर्माण झाल्याने विद्यार्थी शाळेत जाण्यास धजत नसल्याचे चित्र दिंडोरी तालुक्यात सध्या पाहायला मिळत आहे.त्यामुळे या शैक्षणिक वर्षीचे शिक्षण घेण्यासाठी मुलांना शाळेत पाठवयचे की नाही. असा संताप जनक सुर पालक वर्गातुन निघत आहे.

आता यावर बिबट्यांच्या बंदोबस्तासाठी वनविभाग काय भूमिका घेते याकडे तालुक्यातील तमाम जनतेच्या नजरा लागल्या आहेत.

**आतापर्यंत असंख्य कुत्र्याचा बळी :** चार बालकांना बिबट्यांच्या हल्ल्यात आपल्या प्राणांला मुकावे लागले आहे . अनेक भागातील शेळ्या, गाई,वासरे यावर बिबट्यांने हल्ला करून जखमी व बळी घेतले . तालुक्यातील अनेक ठिकाणी अनेकांवर बिबट्यांने हल्ले करून दहशत निर्माण केली आहे . तालुक्यात बिबट्यांचा वावर असणाऱ्या स्थळांवर पिंजरे बसविण्याची मागणी .

**परमोरीमधील आतापर्यंतच्या घटना :** सार्थक ज्ञानेश्वर दिघे ( मयत वय-३ घटना ऑगस्ट २०१८ ) शुभंम राजेंद्र काळोगे ( जखमी वय-१० घटना सप्टेंबर २०१९ ) नकुल योगेश काळोगे ( वय-७ जखमी . घटना मार्च २०१९ ) गायत्री प्रकाश गांगोडे ( मयत जानेवारी २०१९ ) आश्विनी लहु पवार ( वय-९ जखमी २१ जुन २०२३ )

परमोरी गावात गेल्या काही वर्षापासून बिबट्यांने मोठ्या प्रमाणावर दहशत निर्माण केल्याने अनेकांच्या जीवावर जीव घेणा व प्राणांस मुकावे लागण्याची गंभीर परिस्थिती दिवसेंदिवस घडत असुन वनविभागाने पाहिजे अशी कार्यवाही आजपर्यंत झालेली नाही .आता वनविभागाने जागे होऊन बिबट्यांच्या बंदोबस्तासाठी योग्य ती पावले उचलावी .पिंजऱ्याची संख्या वाढवावी .अन्यथा समस्त नागरिक उपोषण करतील . **पप्पू शिवले ( ग्रामस्थ परमोरी ता .दिंडोरी)**





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

निसर्गरूपे या लेखमालेचा आज शेवटचा भाग. या आधीच्या तीन लेखात निसर्गातील पहाट किंवा सकाळ, दुपार आणि रात्र या तीन वेळात दिसणाऱ्या निसर्गरुपांचे वर्णन करण्याचा प्रयत्न केला. आज रात्रीच्या विविध रूपांबद्दल आपण बोलू या. मी फक्त या चार वेळातील निसर्गरूपांबद्दल बोलत असलो तरी निसर्ग प्रत्येकच क्षणाला आपले रूप बदलत असतो. प्रत्येक क्षणाला, घडीला, प्रत्येक दिवसाला निसर्गरूपे वेगवेगळीच असतात. आपल्याला फक्त ती पाहता आली पाहिजेत. याचे प्रत्यंतर आपल्याला आपण जेव्हा हिमालयासारख्या एखाद्या पर्वतरांगांच्या ठिकाणी जातो, तेव्हा येते. तिथे निसर्ग क्षणाक्षणाला आपले रूप बदलत असतो. पर्वतशिखरांवर ढग आलेले दिसतात, लगेच त्या ढगांचे आच्छादन दूर होऊन सोनेरी प्रकाशात हिमशिखरे झळाळून उठतात. तर दुसऱ्याच क्षणाला पाऊस अचानक सुरु होऊन वातावरण बदलून टाकतो. अशी ही सुंदर निसर्गचित्रे ! अशा वेळी मुकेश यांनी गायिलेले ' ये कौन चित्रकार हैं...' अशा गाण्यांचे शब्द मनात रुंजी घालू लागतात. अशीच सुंदर आहेत रात्रीची विविध रूपे. चांदण्याची रात्र, अमावस्येची रात्र, पावसाळी रात्र अशा विविध ऋतूत रात्र वेगवेगळी रूपे घेऊन येते. तुम्हाला दिवस आवडतो की रात्र असा प्रश्न वेगवेगळ्या व्यक्तींना विचारला तर वेगवेगळी उत्तरे येतील. बहुतेक लोक दिवस आवडतो असेही म्हणतील. दिवसा कसा स्वच्छ सूर्यप्रकाश असतो. हव्या त्या गोष्टी, हवी ती कामं करता येतात. रात्री तसा नाईलाज असतो. झोपण्याव्यतिरिक्त फारसे काही करता येत नाही. हे सगळे जरी खरे असले तरी दिवसाची कामे करण्यासाठी ऊर्जा पुरवते ती रात्र ! रात्रीची गाढ झोप तुम्हाला ताजेतवाने करते आणि दिवसाला एका नव्या उत्साहाने तुम्ही सामोरे जाता. म्हणून दिवस जेवढा महत्वाचा आहे, तेवढीच रात्र सुद्धा ! एखादा सिनेमा जेव्हा आपण पाहतो, तेव्हा पडद्यावरील कलाकार फक्त आपल्याला दिसतात. पण तो चित्रपट आपल्यापर्यंत पोहोचवण्यासाठी अनेक पडद्यामागील कलाकारांची मेहनत असते. ती आपल्याला दिसत नाही. पण ज्याच्याकडे ती दृष्टी असेल, त्याला ती जाणवू शकते. दिवसा घडणाऱ्या अनेक घटनांची नोंद इतिहास घेतो, आपणही घेतो. ते ते दिवस आपण साजरे करतो. पण या दिवसांमागे खंबीरपणे उभी असते ती रात्र ! या अर्थाने ती पडद्यामागील कलाकार आहे. एखाद्या यशस्वी पुरुषाच्या पाठीमागे एखादी स्त्री असावी तशी !



## आनंदी पहाट

# जागृत मनोवैचारिक भूमिका महत्त्वाची

आधुनिक केसरी

एकमेकांच्या उणिवा दूर करणे आणि जाणीवा जपणे ही प्रेरणा ह्याच मैत्रीतून मिळत असते. काहीवेळा परस्परांमध्ये स्पर्धा देखील होत असते. पण ह्या स्पर्धेत कोणीही जिंकले तरी आनंद सर्वांनाच होत असतो. ज्या प्रमाणे रामाच्या सहवासात हनुमान धन्य झाला, श्रीकृष्णाच्या हवासाने अर्जुन सर्वश्रेष्ठ योद्धा झाला, याउलट दुर्योधनाच्या सहवासाने भीष्म, कर्ण सर्वश्रेष्ठ असूनही त्यांचा विनाश झाला. आपण ज्यांच्या सोबत रहातो, वावरतो, त्यांच्या विचार, वर्तन आणि व्यवहारांचा थेट परिणाम आपल्या अंतर्मनावर होत असतो. त्यानुषंगाने आपल्या मूळ प्रकृतीत बदल घडत येऊन प्रत्येक बाब त्यांच्यासारखीच आपल्या कृतीतून दिसून येऊ लागते. काहीवेळा सुसंस्कारित मुले ते गुंड, चोर अशा ह्या परिवर्तनाला काही प्रमाणात कारणीभूत ठरतो, तो आपल्या मित्रमैत्रिणींचा सहवास. शाळा-महाविद्यालयांत गेल्यावर सगे-सोबती, साथ-संगत चांगली मिळाली नाही म्हणून तरुण वयांतील मुले-मुली वाममार्गाला गेल्याचे ऐकण्यांत आणि पाहण्यात येते. प्रेरणा घेऊन एखाद्या मित्राचे अनुकरण करून वाईट सवयी लावून घेणे, अर्वाच्च भाषेत बोलणे, व्यसनाधीन होणे अपायकारक आणि हानिकारक असल्याची जाणीव होणे महत्वाचे असते. लहापणापासून आपल्या बालमनावर मित्र परिवारातील प्रत्येकाचा कमी-अधिक प्रमाणांत चांगला-वाईट परिणाम होत असतो. अनकेदा आपल्या अनुकरणप्रिय मनाला मित्रमंडळीत सतत राहून त्यांचे अनुकरण करायची सवय जडलेली असते. आपण ज्या परिसरांत, वातावरणांत वावरत असतो, त्याचा थेट परिणाम आपल्या अंतर्मनावर होत असतो. आपल्या सोबत्यांचा आपल्या कार्यावर, व्यक्तिमत्वावर, वागण्या-बोलण्यावर, व्यवहारावर आणि चैतन्यावर प्रखर प्रभाव पडत असतो. म्हणून आपल्या सभोवती सुस्वभावी, धार्मिक, उच्च स्तरावर जागृत मनोवृत्तीचे लोक असणे महत्वाचे असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**ठायीच चैतन्य | देखिले गा ||**

चोरी झाली घरा | चैन नाही मनी ||
धुंडे त्रिभुवनी | गवसेना ||१||
काय करू सांगा | दिवाळे निघाले ||
सारे दुरावले | गणगोत ||२||
देहाच्या घराला | विकारी कवाडे ||
आत आत्मा कुढे | मौल्यवान ||३||
आनंदला जीव | भेटे तुका वानी ||
एकांताचा धनी | धन्य झालो ||४||
सापडला चोर | चंद्रभागे तीरी ||
उभा विटेवरी | आत्मा चोर ||५||
आनंदले मन | होता दिव्य भेट ||
नको दावू वाट | घराची त्या ||६||
आत्मा-परमात्मा | अद्वैत लावण्य ||
ठायीच चैतन्य | देखिले गा ||७||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

**स्मरन्ति ये जनास्त्वां ते भवन्ति सुखिनः सदा | अभीष्टफललाभाय दुर्गां देवीं नमाम्यहम् || २८ || जे लोक तुझे स्मरण करतात, ते सदैव सुखी होतात. अशा तुला दुर्गा देवीला मी अभीष्टफलाच्या प्राप्तीसाठी नमन करतो.**



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**धर्म नीति व्यवहार ले, पञ्च विषय संग सन्त । नियमित हरि माया रहे, जीवन सुभग सुमन्त ।।३१ ।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल दशम अध्याय) ०४/१०/३१**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

पुरुषार्थी, ज्ञानी संत धर्म, नीति आणि व्यवहार युक्त राहून पंच विषयांचा संग करतात आणि संयमी होऊन माया प्रपंचात राहून आपलं अध्यात्मिक जीवन निर्माण करतात.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## सूक्ष्मभूतेंनिरूपण

आधुनिक केसरी



बारा अदित्य धातु,मित्र,अर्यमा,रूद्र,वरूण,सुर्य,भग,विवस्वत्,पूषन,सवित्र्, त्वष्टा,व विष्णु ही सुर्याची बारा महिन्याची बारा रूपे आहेत. अकरा रूद्र रैवत,अज,भीम,भव,वाम,व्रुषाकपि, अजैकपाद,ऊग्र,अहिबुध्न्य,बहुरूप, महान यातील काही नावे विष्णुसहस्त्र नामात आहेत. हे आपल्या लक्षात आले असेलचं. नवनाग अनंत, वासुकी, शेष,पद्मनाभ, कंबल, शंखपाल, ध्रुतराष्ट्र, तक्षक,व कालिया. अशा नागांच्या नऊ जाती आहेत. सातऋषी कश्यप, अत्रि, भारद्वाज, विश्वामित्र, गौतम, जमदग्नि, वसिष्ठ असे ते सात ऋषेश्वर आहेत. सम्राट चक्रवर्ती मनु, मेघ व अनेक प्रकारच्या जीवांची ऊत्पत्ती हा सर्व विस्तार आहे. मनु हा मनुष्य जातीचा मूळपुरूष आहे. संपूर्ण धरतीवर राज्य करणारा चक्रवर्ती सम्राट हा पहिला राजा आहे. मनु एकुण चौदा आहेत. स्वायंभुव हा पहिला मनु होय. तर वैवस्वतमनु हा हा सातवा मनु आहे. आपला तो मूळपुरूष आहे. अध्यात्माचा उपदेश त्याला सुर्याने केला. आपल्या महान संस्कृती त मंदीरे मठ यांना अनन्य साधारण महत्व आहे. तिथे जाऊन माथा टेकवावा. अनन्यभावे त्याला शरण् जावे. आपण हा समास लिहित आहोत आणि योगायोगाने पंढरपूर च्या पांडुरंगाची अठ्ठावीस युगे निरंतर चालणारी सर्व संताच्या पावन स्पर्शाने वारीचा माहोल सुरू आहे. आपणही त्यात सामील होऊ या. भक्ति रसात चिंब होऊ या.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# वासनानाश हाच मोक्ष

आधुनिक केसरी

पुष्कळदा भक्ती म्हणजे काय, किंवा परमार्थ कशाला म्हणतात हेच आपल्याला कळत नाही. ज्याला प्रपंच नीट करता येत नाही, त्याला नाही परमार्थ करता येणार. प्रपंचाला कंटाळून भक्ती नाही येणार. कंटाळा प्रपंचाचा येण्यापेक्षा विषयांचा आला पाहिजे. मला सुख व्हावे हा प्रत्येक जीवाचा मुख्य हेतू असतो. मोक्ष म्हणजे निरतिशय सुखाचा अनुभव होय. ' जिवंतपणी मिळालेली आत्यंतिक सुखाची स्थिती ' अशी मोक्षाची व्याख्या करता येईल. खरोखर, भगवंताजवळ काय कमी आहे ? एक आपले मन त्याला द्यावे आणि त्याची श्रद्धायुक्त भक्ती करावी. काळजी करणे म्हणजे भगवंतावर भरवसा नसणे होय. प्रारब्धावर देह टाकणे ही खरी संन्यासवृत्ती होय. वासना न ठेवता आपल्या हातून कर्मच होत नाही त्याला काय करावे ? माझे समाधान माझ्याजवळ असताना दुसरीकडे ते मिळेल असे आपल्याला वाटते हेच आपले चुकते. हवेपण संपले नाही तोपर्यंत समाधान नाही. हव्यास मरेपर्यंत सुटतच नाही, हे सर्व रोगांचे मूळ आहे; आणि म्हणूनच ज्याची वासना नाहीशी झाली तो मोक्षत्वाला गेला खरा.



आशेची निराशा झाली नाही तोपर्यंत भगवंताचा दास नाही होता येणार. आशा जेव्हा मनात उठेल तेव्हा ती भगवंताला अर्पण करावी. प्रत्येकाला वाटते मी श्रीमंत व्हावे. पण कितीजण तसे होतात ? म्हणजे ही निराशाच नाही का ? प्रपंच खरोखरीच नाटकासारखा आहे. नाटकामध्ये एखादा मनुष्य राजा झाला काय किंवा भिकारी झाला काय, प्रत्यक्ष जगामध्ये त्याला किंमत नाही. उलट, भिकाऱ्याचे काम करणाऱ्याने जर ते उत्तम केले, तर लोक त्याचे कौतुक करतात. तसे, प्रपंचामध्ये कुणी श्रीमंत असला काय आणि कुणी गरीब असला काय, याला महत्त्व नसून, त्याने भगवंताचे अनुसंधान किती ठेवले याला खरे महत्त्व आहे. आपण पैसा साठविला तर गैर नाही; पण त्याचा आधार न वाटावा. अनुसंधानाच्या आड त्याला येऊ देऊ नये. विषयावर जोपर्यंत तुमचे सुख अवलंबून आहे तोपर्यंत भक्तीचे खरे सुख मिळत नाही. एक भगवंतच मनापासून हवा असे वाटले, म्हणजे तो प्राप्त होतो. ' मी करतो ' असे कधीच म्हणू नये. मी आपल्या तपश्चर्येने भगवंताला पाहीन असे जो म्हणतो त्याला भगवंताचे दर्शन होणे कठीणच असते. विषय मिळाला नाही म्हणजे तळमळ लागते, त्याप्रमाणे भगवंत भेटला नाही तर तळमळ लागावी. आजच्या आपल्या स्थितीत आपल्याला काय करता येणे शक्य आहे, हे प्रथम पहावे. परमार्थ समजून जो त्याचे आचरण करील, त्याला तो लवकर साधेल. त्या माणसाला प्रपंच सोडून जाण्याचे कारण उरणार नाही. **आजचे बोधवचन आहे - १६१. हवे व नको याचा आग्रह नसावा. यातच वासनेचे मरण आहे. श्रीराम समर्थ**

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**स्पृशन्नपि गजो हन्ति जिघ्रनपि भुजङ्गमः**
**हसन्नपि नृपो हन्ति मानयन्नपि दुर्जनः**

**स्पष्टीकरण - या श्लोकाचा मुख्य रोख आहे तो असा - राजा (सत्ताधारी) आणि दुर्जन यांच्याशी फार लगट करू नये. त्यांचे बोलणे आणि करणे या दोन गोष्टीत तफावत असते. आपण मात्र विश्वास धरून चालतो. पण असा विश्वास धरू नये.**

**पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, २३ जून २०२३



निर्मळ मनाची श्रीमंती लाभलेला निष्पाप जिव्हाळा : राजेंद्र रापतवार

पान ६



बांधवांनो वृक्षतोड थांबवा

पान ७

# शेवगावात दरोडेखोरांचा धुमाकूळ, हल्ल्यात पती-पत्नी जागीच ठार!

## सोन्याच्या दागिन्यांसह मोठा ऐवज लंपास; पोलिसांसमोर मोठे आव्हान

आधुनिक केसरी न्यूज

**निळकंठ कराड**

**शेवगाव :** शहरातील मुख्य बाजारपेठ लगत मध्यवस्तीत असलेल्या बलदवा कुटुंबातील व्यक्तीवर सशस्त्र दरोडेखोराकडून दोन व्यक्तींची हत्या करण्यात आल्याची घटना शुक्रवारी पहाटे तीन -चार वाजण्याच्या सुमारास घडल्याने शहरात भितीचे वातावरण पसरले आहे दरोडेखोराकडून सोन्याच्या दागिन्यासह मोठा ऐवज लुटून नेल्याने पोलिसा समोर गुन्हेगारांना शोधण्याचे मोठं आव्हान उभे ठकले आहे. घटनेच्या निषेधार्थ शेवगाव शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला.

शेवगाव शहरात आज पहाटे दरोडेखोरांनी केलेल्या हल्ल्यात पती- पत्नी ठार झाले असून त्यांची सून जखमी झाली आहे. शेवगाव शहरात राहणाऱ्या बलदवा कुटुंबावर दरोडेखोरांनी हल्ला केला आहे. त्यात दोघांचा मृत्यू झाला आहे एक गंभीर जखमी आहेत या घटनेमुळे शेवगाव तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. शेवगाव तालुक्यात सातत्याने खुन, दरोड्याच्या घटना जीवघेणे हल्ले सारखे प्रकार घडत आहे. पोलीस यंत्रणा कुचकामी ठरली जात आहे दंगलीचे प्रकरण ताजे असतानाच आता पुन्हा आज पहाटे शेवगाव शहरात दरोडेखोरांनी मोठा धुमाकूळ घातला आहे. बलदवा कुटुंबावर धारदार शस्त्राने हल्ला केला. शेवगाव येथे भर वस्तीत भीषण दरोडा पडला त्यामध्ये बलदवा





परिवारातील दोघांचा मृत्यू झाला आहे एक गंभीर आहे शहरातील येथील बालाजी मंदिर समोर भर वस्तीत वास्तव्यास असलेल्या बलदवा कुटुंबीयांवर आज पहाटे ४ वाजणेचे दरोडा पडला. त्यामध्ये किंमती ऐवज तर लंपास झालाच, पण बलदवा परिवारातील दोन सदस्यांना देखील दरोडेखोरांनी जिवे मारले अहमदनगर जिल्हा माहेश्वरी युवा संघटनचे उपाध्यक्ष गौरेश बलदवा यांच्या मातोश्री पुष्पाताई बलदवा व चुलते गोपीकिसन बलदवा यांना दरोडेखोरांनी जीवे मारले. दरोडेखोरांनी वीट फेकून मारल्यामुळे सुनिता गोपीचंद बलदवा गंभीर जखमी होऊन

त्यांच्या डोक्याला देखील टाके पडले असल्याचे प्रत्यक्ष दर्शींनी सांगीतले आहे. या दोघांना रक्ताच्या थारोळ्यात पडलेले पाहून शेवगावकर हळहळ व्यक्त करत आहेत. या घटनेने शेवगाव सह परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली आहे. ठसेतज्ञ व श्वान पथकही पाचारण करण्यात आले आहे. आज पहाटे शेवगांव शहरातील बालाजी मंदिराजवळ राहत असलेल्या बलदवा कुटुंबावर दरोडेखोरांनी हल्ला केला असून, त्यात कुटुंबातील दोघांचा जागीच मृत्यू झाला असून, एका सदस्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, या हल्ल्यात किमती सामानासह मोठा एवज लुटला गेल्याचे सांगण्यात येत आहे. दरोडेखोरांच्या हल्यात मृत्यूमुखी पडलेल्या मध्ये गोपीकिसन बलदवा आणि पुष्पाताई बलदवा यांचा समावेश आहे. तर सुनिता बलदवा गंभीर जखमी झाल्या आहेत. घटनेमुळे शेवगांव शहरात खळबळ उडाली असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. भर वस्तीत घडलेल्या या घटनेमुळे आश्चर्य व्यक्त केले जातात आहे.

घटनेची माहिती मिळताच नगर चे पोलीस अधीक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांनी पोलीस पथकासह घटनास्थळी धाव घेतली असून, ठसे तज्ञ तथा श्वान पथकाला पाचारण करण्यात आले आहे.

गेल्या महिन्यापासून शेवगाव शहरातील हिंदू -मुस्लिम जातीय तणावाचे वातावरण पसरले असताना मध्यवस्तीत पडलेल्या दरोड्याच्या घटनेमुळे शहरवसियांत दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

अज्ञात तीन ते चार सशस्त्र दरोडेखोरांनी प्रथम गौरव बदलवा यांच्या घराला बाहेरुन कडी लावली व नंतर वेगळ्या मार्गाने गोपीकिशन बदलवा यांच्या घरात प्रवेश करुन झोपेत असतानाच त्यांच्या डोक्यावर गजाने प्रहार केला . त्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला . तर चोरी करताना पुष्पा बदलवा जाग्या झाल्याने त्यांनाही जीवे मारले . या घटनेत तीन चोरटे दुचाकी वाहनावरुन आल्याचे सीसीटीव्ही कॅमेरा फुटेजमध्ये दिसत असल्याचे समजते . घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला, पोलीस उपविभागीय अधिकारी सुनिल पाटील, सहाय्यक पोलीस अधीक्षक बी . चंद्रकात रेड्डी, पोलिस निरीक्षक विलास पुजारी यांनी घटनास्थळी धाव घेतली . अधिक तपासासाठी श्वान पथकही घटनास्थळी दाखल झाले होते . तसेच माजी आमदार चंद्रशेखर घुले , राष्ट्रवादी कॉँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अँड .प्रताप ढाकणे आदींसह विविध पक्षांचे पदाधिकारी कार्यकर्ते यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली आमदार मोनिका राजळे यांनी घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करुन पोलीसांना त्वरित तपास चालण्याच्या सुचेना दिल्या आहेत .

### अखिल भारतीय मारवाडी संमेलन आणि माहेश्वरी सभाच्या वतीने जाहीर निषेध : चंदुलाल बियाणी



**बीड :** शेवगावमध्ये भर वस्तीत मारवाडी गल्ली मधील बालाजी मंदिर जवळील आडत व्यापारी गोपीकिशन बलदवा यांच्या घरी पहाटे तीन ते चारच्या दरम्यान सशस्त्र दरोडा टाकण्यात आला . या दरोड्यात सशस्त्र दरोडेखोराकडून धारदार शस्त्राने वार करण्यात आले, त्यात गोपीकिशनबलदवा व श्रीमती पुष्पा बलदवा या दोन जणांची हत्या करण्यात आली, तर एक महिला वीट फेकून मारल्यामुळे गंभीर जखमी झाली आहे . या घटनेचा अखिल भारतीय मारवाडी संमेलन आणि माहेश्वरी सभाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत आहे, असे अखिल भारतीय मारवाडी संमेलन, मराठवाडा प्रभारी चंदुलाल बियाणी यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे . गोपीकिशन बलदवा हे छत्रपती संभाजीनगर येथील बालकिशन बलदवा यांचे चुलत बंधू आहेत . मारवाडी समाज अल्पसंख्यांक असून कुठल्याही वादात लिप्त नसतो, आपले घर आणि आपला व्यापार या चाकोरीतून बाहेर कधीही जात नाही . तरीही या समाजावर समाजकंटकाकडून अथवा दरोडेखोराकडून नियमित हल्ले होत असतात . याविषयाची गंभीर दखल घेऊन गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घालून या घटनेचा लवकरात लवकर शोध लावावा आणि यातील आरोपींना कडक शिक्षा करण्यात यावी, असे आवाहन अखिल भारतीय मारवाडी संमेलनचे मराठवाडा प्रभारी तथा बीड जिल्हा माहेश्वरी सभेचे उपाध्यक्ष चंदुलाल बियाणी यांनी केले आहे . या घटनेचा लवकरात लवकर छडा लावावा नसता समाजातर्फे तीव्र आंदोलन करण्यात येईल, असे अवाहनात नमूद करण्यात आले आहे .

# आ. हरिभाऊ बागडेंचा पंचायत समितीत ठिय्या

## विहिरीचे प्रस्ताव धूळखात; प्रशासनाचा गलथान कारभार

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** पंचायत समिती कार्यालयात काल दिनांक 22 जुन रोजी आमदार हरिभाऊ बागडे यांनीही ठिय्या मांडला होता. सदर हा प्रकरण असा आहे की, फुलंब्री पंचायत समिती कार्यालयाच्या गैरकारभारामुळे रोहयो अंतर्गत विहीरीच्या लाभार्थींची हजारो प्रस्ताव मंजूरी अभावी पडुन असल्याचे दिसून आले. यात आमदार हरिभाऊ बागडे यांनी संताप व्यक्त करत रात्री 10 वाजेपर्यंत ठिय्या मांडन्यात आला असे समजतास भाजपाचे ता. अध्यक्ष सुहास शिरसाठ मा.जि.प. सदस्य शिवाजी पात्रीकर मा. सभापती सर्जेराव मेटे शहर अध्यक्ष योगेश मिसाळ ओ.बी.सी. तालुका अध्यक्ष राम बनसोड युवा शहराध्यक्ष वाल्मीक जाधव रोशन अवसरमल कल्याण चव्हाण यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी पंचायत समिती धाव घेतली. पंचायत समिती कार्यालयातील गटविकास अधिकाऱ्यांच्या दालनात ज्योती कवडदेवी यांच्या गैरहजेरीत तब्बल चार तास कार्यालयात बसून राहिले. बागडे यांनी औरंगाबाद जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांच्या सोबत संपर्क साधला व भ्रष्ट कारभाराचा पाडा वाचला, त्यांनी उपकार्यकारी अधिकारी अनुपमा नंदनकर यांना पाठवले. यावर गटविकास अधिकारी ज्योती कवडदेवी फुलंब्री पंचायत समितीत आल्या व बागडे यांनी खडेबोल सुनवले. तसेच रात्री उशिर झाल्याने फुलंब्री शहरातील भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांकडून रात्र भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.





# शेवगाव येथील हत्येच्या निषेधार्थ पैठण माहेश्वरी समाजाने तहसीलदारांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज


**पैठण :** अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव येथे सशस्त्र दरोडा टाकून 2 जणांची हत्या करण्यात आली त्या घटनेच्या निषेधार्थ पैठण तालुका माहेश्वरी सभेच्या वतीने मा.तहसीलदार श्री सारंग चव्हाण यांना निवेदन देण्यात आले. शेवगाव येथील प्रसिद्ध व्यापारी गोपिकीशन बलदवा यांच्या घरी आज सकाळी सशस्त्र दरोडा टाकून 2 जणांची हत्या करण्यात आली.मारवाडी समाजावर समाजकंटकाकडून अथवा दरोडेखोराकडून नियमित होत असतात या विषयाची प्रशासनाने गंभीर दखल घेऊन घटनेचा लवकरात लवकर शोध लावावा आणि यातील आरोपींना कडक शिक्षा करण्यात यावी जेणेकरुन पुन्हा असे कृत्य करण्याची परत हिम्मत होऊ नये, असे निवेदन पैठण तालुका माहेश्वरी समाजाच्या वतीने तहसीलदार श्री सारंग चव्हाण यांना देण्यात आले. या प्रसंगी पैठण तालुका माहेश्वरी सभेचे अध्यक्ष राधाकिसन लोहिया, जिल्हा उपाध्यक्ष सचिन लखोटीया, तालुका उपाध्यक्ष तथा पैठण शहर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष पवन लोहिया,जगदिश नागोरी, गणेश लोहिया, उमेश बाहेती, संजय सारडा, विजय पापडीवाल,मधुसूदन मुंददा, सौरभ पल्लोड, योगेश लोहिया, राज मानधने, अजय पोरवाल,गोपाल लखोटीया, महेश बजाज, मयूर लोहिया, ऋषि लखोटीया, सुरज नागोरी, आशिष सारडा, गोविंद पोरवाल, सर्वेश धूत, दीपक चांडक आदी समाजबांधव उपस्थित होते.



# भुजबळांची मागणी

आधुनिक केसरी

छगन भुजबळांना प्रदेशाध्यक्ष व्हायचे नाही. ओबीसी नेत्यांना संधी मिळाली पाहिजे. राष्ट्रवादी पक्षांची मराठा पक्ष ही इमेज पुसली जावी. म्हणून ओबीसी नेत्यांना संधी द्यावी, शरद पवार यांना या सगळ्या गोष्टी कळतात, असे सूचक विधान राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांनी केले. गेल्या काही दिवसांपासून अजित पवार यांच्या वक्तव्यांनंतर राष्ट्रवादी पक्षातच प्रदेशाध्यक्ष पदावरुन कलगीतुरा रंगल्याचे पाहायला मिळत आहे. आज छगन भुजबळ हे नाशिकमध्ये असून सकाळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. छगन भुजबळ यांनी यावेळी राष्ट्रवादी पक्षातील प्रदेशाध्यक्ष पदावरुन चाललेली धुसफूस, तसेच विरोधकांची आजची बैठक, महाराष्ट्रात बीआरएसची झालेली एंट्री या सगळ्या बाबींवर प्रकाश टाकला. ते यावेळी म्हणाले की, विरोधकांची आजची बैठक अतिशय महत्त्वाची असून काँग्रेसचे लोक देखील उपस्थित आहेत. शरद पवार, उद्धव ठाकरे हे देखील हजार राहतील. सर्व विरोधक एकत्र आल्याने राज्यावरील संकट बदलू शकते, अशी आशा व्यक्त करत आपण सगळ्यांनी त्यांना शुभेच्छा द्यायला पाहिजे, असे आवाहन राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांनी केले आहे. तसेच प्रदेशाध्यक्ष पदावरुन चाललेल्या वादावरुन छगन भुजबळ म्हणाले की, अजूनही देशात समाजा-समाजाचे राजकारण केले जात आहे. त्यावेळी प्रमोद महाजन असताना गोपीनाथ मुंडे यांना पुढे केले. काँग्रेसने हेच केले. पक्ष आणि विधिमंडळ येथील पदे वेगवगेळ्या समाजाला दिले जात आहेत. चंद्रशेखर बावनकुळे यांना पक्षाने तिकीट नाकारले होते. आमदार नसताना यांना अध्यक्ष केले. नाना पाटोले यांना देखील अध्यक्ष केले आहे. राऊत हे देखील ओबीसी असून काँग्रेसचा मी विरोधी पक्षनेता होतो. शिवसेना-बीजेपी विरोधात मी लढलो. माझ्यानंतर बबनराव पाचपुते यांना मोठ्या समाजाचे असल्याने प्रदेशाध्यक्ष केले. मी पण काम केले आहे. शरद पवार यांच्यासारखा देशाचा नेता असताना आपला मुख्यमंत्री होऊ शकला नाही. हे मनाला बोचतं अशी खंतही भुजबळांनी बोलून दाखवली. राजकारणात वेगवेगळ्या दमाचे लोक आहेत. आव्हाड, मुंडे, तटकरे यांचे नाव मी घेतले. भुजबळांना प्रदेशाध्यक्ष व्हायचं नाही. ओबीसी नेत्यांना संधी मिळाली पाहिजे. मराठा पक्ष ही इमेज पुसली जावी. म्हणून ओबीसी नेत्यांना संधी द्यावी, शरद पवार यांना या सगळ्या गोष्टी कळतात, असे सूचक विधानही यावेळी भुजबळ यांनी केले. दरम्यान भुजबळ पुढे म्हणाले की, वेगववगळ्या समाजात पदे वाटली पाहिजे. साधारण 91 पासून मी शरद पवार यांच्यासोबत आहे. मलाच करा असे नाही. राष्ट्रवादी मराठा लोकांची पार्टी नाही, पण लोकांमध्ये समज आहे. तो पुसला जावा, यासाठी ओबीसी नेत्यांना संधी दिली जावी, अशी अपेक्षा छगन भुजबळ यांनी व्यक्त केली आहे.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

# भारताला कायमस्वरूपी सदस्यत्व मिळावे

आधुनिक केसरी

**भारताला संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत कायमस्वरूपी सदस्यत्व मिळायला पाहिजे. सुरक्षा परिषदेची सध्याची रचना १९४५-४६ वर आधारित आहे. तेव्हापासून जग खूप बदलले आणि सत्तेचा समतोलही बदलला आहे. मात्र सुरक्षा परिषदेत हा बदल दिसत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरक्षा परिषदेत भारताच्या समावेशाचे जोरदार समर्थन केले आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिकेला रवाना होण्यापूर्वी वालस्ट्रीतला दिलेल्या मुलाखतीत संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेतील स्थायी सदस्यतेवर महत्वूर्ण वक्तव्य केले. सुरक्षा परिषदेत भारताला स्थायी सदस्यता मिळावी. या परिषदेचे मूल्यांकन व्हावे. भारत संघर्ष समाप्त करून स्थायी शांती आणि स्थिरता आणण्यासाठी वास्तविक प्रयत्नांचे समर्थन करत असल्याचे त्यांनी दिलेल्या मुलाखतमधून स्पष्ट केले.**

जुनी व्यवस्था जी भूतकाळातील आव्हानांना तोंड देण्यासाठी तयार करण्यात आली होती, आजच्या गतिमान आणि परस्परावलंबी जगाची आव्हाने सोडवण्याची अपेक्षा करता येणार नाही. या पाश्वभूमीवर सुरक्षा परिषदेची पुनर्रचना करून भारताला स्थायी सदस्यत्व.,असा दावा भारताने वेळोवेळी केलेला आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद आणि आतापर्यंतचा प्रवास संयुक्त राष्ट्रसंघाचे प्रमुख अंग असलेल्या संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचा ७८ वर्षांचा इतिहास यश आणि अपयशाचा संमिश्र स्वरूपाचा आहे. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा राखण्याची जबाबदारी असलेली मूलभूत संस्था म्हणून सुरक्षा परिषदेची स्थापना करण्यात आली. सुरक्षा परिषदेत १५ सदस्य राष्ट्रांचा समावेश आहे, त्यापैकी पाच कायमस्वरूपी आहेत आणि त्यांना व्हेटो पॉवर (P5) आहे. हे देश अमेरिका, युनायटेड किंगडम (यूके), रशिया, चीन आणि फ्रान्स आहेत. हे देश संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेच्या वेळी महायुद्धाचे विजेते ठरले आणि त्या वेळी मोठी लष्करी शक्ती होती. १९४५ मध्ये युनायटेड नेशन्सच्या स्थापनेनंतर, आंतरराष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यावर सामूहिक चर्चा आणि निर्णय घेणे आवश्यक आहे याची खात्री करण्यासाठी या पाच देशांनी जवळजवळ 'स्वतःहून' सुरक्षा परिषदेचे सदस्यत्व मजबूत व्हेटो पॉवरसह मिळवले. तो, संतुलन राखणे. गेल्या ७८ वर्षात तिसरे महायुद्ध झाले नाही हे सुरक्षा परिषदेचे सर्वात मोठे यश आहे. तसेच, P5 च्या दोन्ही देशांमध्ये थेट लष्करी संघर्ष झालेला नाही. सुरक्षा परिषद अनेक महत्त्वाच्या सुरक्षा समस्यांचे निराकरण करण्यात यशस्वी ठरली आहे आणि १९५० मध्ये कोरियन युद्ध, १९९० मध्ये इराकने कुवेतवर केलेले आक्रमण, १९९३ मध्ये बोस्निया, २००१ मध्ये अफगाणिस्तान इत्यादी मुद्द्यांवर यशस्वीपणे ठराव पारित केले आहेत. १९६२ मध्ये क्युबन क्षेपणास्त्र संकटाच्या वेळी दोन P5 देशांमधली थेट लढत झाली असावी. परंतु संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस यू थांट यांनी अवलंबलेल्या प्रतिबंधाच्या मुत्सद्देगिरीमुळे या परिस्थितीलाही सामोरे जावे लागले. सुरक्षा परिषदही अनेक बाबतीत अपयशी ठरली आहे. २००३ मध्ये अमेरिकेच्या नेतृत्वाखाली इराकवर आक्रमण, 2008 मध्ये जॉर्जियावर रशियाचे आक्रमण, अरब-इस्त्रायल युद्ध, १९९४ रवांडन नरसंहार, १९९३ सोमालियन गृहयुद्ध, १९९५ स्रेब्रेनिका हत्याकांड आणि सध्याचे रशिया-युक्रेन युद्ध, इतर. अशी काही उदाहरणे आहेत जेव्हा सुरक्षा परिषदेने एकतर विलंबाने प्रतिक्रिया दिली किंवा ठराव मंजूर करण्यात अयशस्वी झाले कारण P5 चे सदस्य संघर्षाचा पक्ष होते आणि त्यांनी त्याचा व्हेटो पॉवर वापरला.

गेल्या काही दशकांमध्ये, विविध बहुपक्षीय आणि जागतिक व्यासपीठांवर संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचे पुनरावलोकन आणि सुधारणांचे आवाहन करण्यात आले आहे. उदयोन्मुख अर्थव्यवस्था G4 गटात (ज्यात भारत, जपान, जर्मनी आणि ब्राझील यांचा समावेश आहे) समावेश करण्यासाठी कायम सदस्यांची संख्या वाढवण्याची मागणी करत आहेत. अशीही चिंता आहे की आफ्रिकेतील कोणताही देश सुरक्षा परिषदेचा स्थायी सदस्य नाही आणि म्हणून इजिप्त किंवा दक्षिण आफ्रिकेसारख्या देशाचाही विचार केला पाहिजे. परंतु P5 अजूनही मवाळ भूमिका घेण्यास तयार नाही आणि संयुक्त राष्ट्र महासभेत खोलवर फूट पडली आहे. भारत संयुक्त राष्ट्रांच्या संस्थापक सदस्यांपैकी एक आहे आणि आठ वेळा संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचा स्थायी सदस्य राहिला आहे. शेवटच्या वेळी ते २०२१-२२ मध्ये सुरक्षा परिषदेचे तात्पुरते सदस्य झाले. भारताच्या वाढीच्या कथेमुळे, विशेषतः गेल्या दोन दशकांमध्ये, भारत सरकार तसेच इतर अनेक प्रादेशिक/जागतिक मंचांनी वेगवेगळ्या प्रसंगी भारताला संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचे स्थायी सदस्यत्व मिळावे यासाठी आवाहन केले गेले आहे. फेब्रुवारी २०२२ मध्ये जेव्हा रशिया आणि युक्रेनमध्ये युद्ध सुरू झाले, अशा वेळी जेव्हा पाश्चात्य देश परिस्थितीशी झुंजत होते, तेव्हा भारतच जागतिक नेता म्हणून उदयास आला आणि जगाच्या केंद्रस्थानी आला. दिल्ली लवकरच जागतिक राजधानी बनली आणि पंतप्रधान मोदींचे अध्यक्ष पुतिन यांच्या भेटीदरम्यानचे प्रसिद्ध विधान "युद्धाचे वय नसते" हे आजही अनेक जागतिक मंचांवर प्रतिध्वनित होते.

उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमधील देशांनी G4 गटात (ज्यामध्ये भारत, जपान, जर्मनी आणि ब्राझील यांचा समावेश आहे) समावेश करण्यासाठी कायम सदस्यांची संख्या वाढवण्याची मागणी केली आहे.तसे, भारताच्या भूमिकेचे जगभरात कौतुक केले जाते हे एकमेव कारण नाही. पारंपारिकपणे, भारताच्या परराष्ट्र धोरणाचा दृष्टीकोन हा इतर देशांच्या कारभारात हस्तक्षेप न करणारा आहे. कोणत्याही आंतर-प्रादेशिक विवादात बाजू घेण्यापासून भारत स्वतःला तत्त्वतः परावृत्त करतो. इतर देशांच्या भूभागाबाबत कोणतीही महत्त्वाकांक्षा नसलेली शक्ती म्हणून भारताची ओळख आहे, याचेही जगभरात कौतुक होत आहे. भारताने अण्वस्त्रांबाबत 'प्रथम वापर नाही' असे धोरण जाहीर केले आहे. परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीनेही ही महत्त्वाची घोषणा आहे.

भारताच्या अर्थव्यवस्थेचा आकार लक्षणीय आहे जी जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनणार आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) च्या मूल्यांकनानुसार, भारताची अर्थव्यवस्था पुढील काही वर्षांमध्ये जगातील सर्वात वेगाने वाढणारी असेल. भारताकडे जगातील तिसरी सर्वात मोठी सशस्त्र सेना आहे, तसेच भारताचे अंतराळ आणि क्षेपणास्त्र कार्यक्रम जगातील सर्वात प्रगत आहेत. भारताच्या उदयाची चर्चा करताना हा आणखी एक महत्त्वाचा पैलू लक्षात घ्यावा लागेल. भारतात आजकाल नावीन्य आणि उत्पादनाची खूप चर्चा होत आहे. भारत आक्रमकपणे स्टार्टअप्सना प्रोत्साहन देत आहे आणि २०२२पर्यंत चीनला मागे टाकून जगातील सर्वात जास्त युनिकॉर्न (US$1 अब्ज किंवा त्याहून अधिक मूल्याचे स्टार्टअप) असलेला देश म्हणून उदयास आला आहे. परदेशी भारतीय किंवा पीआयओ (पीपल ऑफ इंडियन ओरिजिन) जगभरातील कॉर्पोरेट्स आणि सरकारांमध्ये उच्च पदांवर आहेत.

२०२३ मध्ये, G20 आणि SCO या दोन शक्तिशाली जागतिक मंचांचे अध्यक्षपद भूषवण्याचा भारताला विशेष विशेषाधिकार आहे. खरं तर, डिसेंबर २०२२ मध्ये, जेव्हा भारत संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचा अध्यक्ष होता, तेव्हा त्याला एकाच वेळी तीन प्रतिष्ठित संस्थांचे अध्यक्षपद मिळाले होते. अलिकडच्या वर्षांत, भारताने असे अनेक उपक्रम घेतले आहेत ज्याचा जागतिक समुदायाने स्वीकार केला आहे, मग तो २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन असो किंवा या वर्षीचे आंतरराष्ट्रीय बाजरीचे वर्ष असो. पृथ्वी वाचवण्याच्या उपक्रमातही भारत आघाडीवर आहे. २०२२ मध्ये इजिप्तमध्ये COP27 शिखर परिषद असो किंवा २०१५ पासून आंतरराष्ट्रीय सौर आघाडीच्या माध्यमातून सौरऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन देणे असो भारताने हवामान बदलाच्या समस्येचे निराकरण करण्यात आघाडीची भूमिका बजावली आहे. अमेरिका आणि रशिया या दोन्ही देशांसोबत भारताची धोरणात्मक भागीदारी आहे आणि दोन्ही देश भारताला महत्त्वाचा भागीदार म्हणून पाहतात. संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमेतील सर्वात मोठा योगदानकर्ता म्हणून भारताची भूमिका सर्वांना माहीत आहे. भारत आणि संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या स्थायी सदस्यत्वाचा मुद्दा गेल्या काही वर्षांत भारताने सुरक्षा परिषदेचे स्थायी सदस्यत्व नसतानाही जागतिक नेतृत्वाची भूमिका स्वीकारली आहे. सध्याच्या रशिया-युक्रेन युद्धात भारताच्या आवाजाचा जागतिक प्रभाव आहे. अरब देश, इस्त्रायल आणि इराण यांच्याशी एकाच वेळी स्वतंत्र आणि जवळचे संबंध असलेला भारत कदाचित जगातील एकमेव मोठा देश आहे. किंबहुना, इजिप्तसोबतच्या भागीदारीचे धोरणात्मक भागीदारीत रूपांतर करण्याच्या करारावर स्वाक्षरी केल्यामुळे, भारताची आता तीन अरब देशांसोबत (सौदी अरेबिया, यूएई आणि इजिप्त) धोरणात्मक भागीदारी आहे. याशिवाय भारताचे इस्रायलशी विशेष सामरिक संबंध असून इराणशी संबंध पुन्हा पूर्ववत झाले आहेत. हे संबंध जगातील सर्वात गोंधळाच्या प्रदेशात बांधले गेले आहेत. अमेरिका आणि रशिया या दोन्ही देशांसोबत भारताची धोरणात्मक भागीदारी आहे आणि दोन्ही देश भारताला महत्त्वाचा भागीदार म्हणून पाहतात. संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमेतील सर्वात मोठा योगदानकर्ता म्हणून भारताची भूमिका सर्वांना माहीत आहे. मार्च २०१५ मध्ये येमेनमध्ये युद्ध सुरू असताना, तेथील नागरिकांना बाहेर काढताना, भारताने ४८ इतर देशांतील १९५० नागरिकांनाही बाहेर काढले. का ? याचे कारण असे की, भारत हा एकमेव देश होता ज्यावर युद्धात सहभागी असलेल्या पक्षांनी विश्वास ठेवला आणि आपल्या नागरिकांना बाहेर काढण्याची परवानगी दिली. त्यामुळेच भारताला संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत कायमस्वरूपी सदस्यत्व मिळण्याची खात्री आहे, प्रश्न 'जर' नसून 'केव्हा'चा आहे. दरम्यान, या मुद्द्यावर आपला मुत्सद्देगिरी वापरण्याऐवजी किंवा स्वतःसाठी प्रचार करण्याऐवजी, भारत एक प्रमुख आर्थिक आणि लष्करी शक्ती, एक जबाबदार आणि विश्वासार्ह जागतिक शक्ती, जी खरोखरच 'विश्वगुरू' आहे, म्हणून विकसित करण्यावर लक्ष केंद्रित करू शकतो.



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

# स्त्री-पुरुष समानता अद्याप दूरच!

आधुनिक केसरी

**आज स्त्री-पुरुष समानतेचा नवा अध्याय लिहिण्याची चर्चा सुरू असताना, लहान मुलींवरील बलात्काराच्या बातम्या वाचून आणि ऐकून आपल्या मनात संतापाच्या लाटा उसळतात. बस, ट्रेन, सार्वजनिक ठिकाणी महिलांची चेष्टा करणे, त्यांचे कपडे, राहणीमान, बोलणे, शारिरीक रूप, रंग इत्यादींबद्दल असभ्य टिप्पण्या करणे, घरगुती महिलांच्या कामाचे अवमूल्यन करणे इत्यादी गोष्टी म्हणजे स्वतःच एक दुःखद आश्चर्य आहेत.खरे तर, खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानता संपूर्ण जगात अजून खूप दूरची गोष्ट आहे. संयुक्त राष्ट्रने महिला समानतेबाबत 2017 ते 2022 या कालावधीत जगभरातून गोळा केलेल्या आकडेवारीच्या आधारे असे म्हटले आहे की, दहापैकी नऊ जणांना महिलांबाबत भेदभाव वाटतो.**

पंचवीस टक्के पुरुषांना त्यांच्या पत्नीला मारहाण करण्यात काही नुकसान किंवा वाईट दिसत नाही.पन्नास टक्के लोकांचा असा विश्वास आहे की पुरुष चांगले राजकारणी आहेत.स्वतःला महिला समानतेचा नेता म्हणवणाऱ्या जर्मनीमध्ये, एका सर्वेक्षणातून असे समोर आले आहे की 100 पैकी 33 पुरुष अधूनमधून महिलांवर हात उगारणे सामान्य मानतात. असं ते 'आपला सन्मान अबाधित राखण्यासाठी' करतात.

भारतीय समाज आणि व्यवस्थेत महिलांच्या समानतेची आणि अधिकारांची चर्चा आजही वास्तविक संदर्भापासून दूर आहे. घटनेनुसार सर्वांना समान कायदेशीर अधिकार असूनही एका विशिष्ट मर्यादेनंतर या गोष्टी स्त्रीसाठी पुस्तकी बनतात.सामान्य घरांतल्या असो किंवा सुशिक्षित घरांतल्या वातावरणाबद्दल बोलायचे झाले तर जवळजवळ सर्व गृहिणींना पैसे कमावणाऱ्या कुटुंबातील पुरुषांकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे ऐकावे लागते की 'तुम्ही माझी कमाई खातेस तेव्ह तुला मी सांगतो तसेच वागावे लागेल.' स्वतःच्या पायावर उभं राहून घर चालवणाऱ्या महिलांनाही वेळोवेळी अशा गोष्टींना सामोरे जावे लागते.घरातील किंवा नोकरदार महिलांचे हक्क असोत, विधवाविवाह असोत, वडिलांच्या मालमत्तेतील मुलींचे हक्क असोत, कामाच्या ठिकाणी समानता असो, हुंड्याची समस्या असो, लग्नाशी संबंधित रूढी-परंपरा असोत, प्रत्येक स्तरावर असमानता आहे. मोठी गोष्ट ही आहे की लोकांनी (बहुतेक स्त्रियांनीही) ही विषमता जीवनाची वस्तुस्थिती समजून स्वीकारली आहे. शतकानुशतके चालत आलेल्या परंपरांनी एक प्रकारे संविधान आणि कायद्याच्या गोष्टींना बगल दिली आहे.

अलीकडच्या काळात अनेक स्तरांवर महिलांबाबत मोठ्या वर्गात नकारात्मकतेची भावना वाढली आहे. हे लोकांच्या बोलण्यातून, वागण्यातून पुन्हा पुन्हा सिद्ध होत आहे. स्त्रियांना सूचित करण्यासाठी वापरली जाणारी पारंपारिक वाक्ये जसे- 'स्त्री आहेस, स्त्रीसारखं राहा', 'बांगड्या घालून बसा', 'स्त्री ही घराची इज्जत आहे' इत्यादी आजही जाहीरपणे बोलले जाते.स्त्रियांशी निगडीत शिव्या, नकारात्मक विनोद आणि स्त्रियांवर केलेल्या टिप्पण्या इत्यादी सर्वत्र ऐकायला आणि वापरल्या जाताना दिसतात. या सगळ्यातून समाजाची महिलांबाबतची दुटप्पी मानसिकता दिसून येते.उल्लेख करण्याजोगी गोष्ट ही आहे की, ज्या घरांतून आणि समाजातून मुली आणि स्त्रियांशी संबंधित प्रगती,



समानता आणि सन्मानाची परिस्थिती दिसून येते, तिथेच वरील नकारात्मकता दिसून येते.त्याच घरांमध्ये आणि समाजात महिला आणि मुलींसोबत शारीरिक आणि मानसिक दुष्कृत्येही घडतात.अर्धनारीश्वर आणि शक्तिस्वरूपा दुर्गा या संकल्पना असलेल्या समाजात स्त्रियांना भोग, वस्तु आणि तुच्छतेच्या पातळीवर का टाकले जाते ?स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या भारतीय समाजात घरापासून ते बाहेरपर्यंतची कोणतीही जागा तिच्यासाठी सुरक्षित का नाही ?

आपल्या मुलांच्या हक्काबाबत आपण कसे जागरूक असतो, पण तिथे सून-मुलींचा प्रश्न येताच आपण कसे परंपरावादी बनतो, याचा विचार आपण केला पाहिजे. विशेष म्हणजे, भारतीय समाज कायदे आणि नियमाबरोबरच लहान-मोठ्या प्रथा आणि विधींनी चालतो.यातील काहींनी त्यात सौंदर्य आणि रंग भरले आहेत, तर काहींनी अडथळा म्हणूनही काम केले आहे. याने एक बाजू सर्व शक्तीशाली आणि दुसरा वर्ग एक कठपुतळी बनवला आहे.घर-कुटुंब, समाज, चालीरीती, परंपरा या सर्वांनी मिळून स्त्रीविरोधी समाज घडवण्यात आपली भूमिका बजावली आहे. भ्रामक कथा तयार केल्या गेल्या आणि पुरुषांना सर्वशक्तिमान आणि स्त्रियांना गरीब, असहाय आणि गुलाम म्हणून चित्रित केले गेले.त्या सर्व गोष्टी अजूनही आपल्या समाज वातावरणात कमी-अधिक प्रमाणात जिवंत आहेत. समतावादी समाजाच्या निर्मितीसाठी या विचारावर आक्रमण करून समूळ नष्ट करणे आवश्यक आहे.स्त्री-पुरुष समानतेची सुरुवात प्रत्येक घरापासून व्हायला हवी. मुलगा आणि मुलगी दोघांनाही समान हक्क आणि अधिकार आहेत. त्यामुळे बंधने आणि स्वातंत्र्यही दोघांसाठी समान असले पाहिजे. स्त्री समानता आणि सर्व स्तरांवर समानता ही एक उत्तम जग आणि उत्तम समाज निर्माण करण्यासाठी आवश्यक अट आहे.-

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# अन्नदात्यावरील संकट टळो आणि काँग्रेसची सत्ता येवो !

## नाना पटोलेंचे तुळजाभवानी चरणी साकडे

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** राज्यातील अनेक भागात अजून पेरण्या झालेल्या नाहीत. काही ठिकाणी दुबार पेरणीचे संकट आहे. सरकारी मदत मिळत नाही, अन्नदाता बेहाल झाला असून आत्महत्या चारपटींनी वाढल्या आहेत. बळीराजावरील हे अस्मानी, सुलतानी संकट टळू दे, भरपूर पाऊस पडो, पीक भरघोस येवू दे आणि शेतकऱ्याच्या घरी आर्थिक संपदा येऊ दे. त्याचबरोबर देशावर व महाराष्ट्रावर आलेले भाजपाचे संकट दूर होऊन काँग्रेसची सत्ता येऊ दे, असे साकडे आई तुळजाभवानी चरणी घातल्याचे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले.
काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले धाराशिव व सोलापूरच्या दौऱ्यावर असून सकाळी त्यांनी आई तुळजाभवानीचे दर्शन घेतले. त्यानंतर ते प्रसार माध्यमांशी बोलत होते. यावेळी पटोले पुढे म्हणाले की, भाजपाचे राज्यातील व केंद्रातील सरकार शेतकरी विरोधी आहे, शेतकऱ्यासमोर सर्वबाजूंनी संकटं उभी आहेत पण भाजपाचे हे सरकार केवळ पोकळ घोषणा करत आहे, शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहचतच नाही. शेतकरी विरोधी भाजपाला पावसाळी अधिवेशनात जाब विचारू. महाराष्ट्रात भ्रष्टाचारी व्यवस्था आहे, तसेच लोकशाही व संविधान संपवण्याचे काम केंद्र सरकारकडून केले जात आहे. मोठ्या संघर्षानंतर, काँग्रेस विचाराने देशाला स्वातंत्र्य मिळाले आहे पण आज देशाचे स्वातंत्र्य, लोकशाही व संविधान धोक्यात आहे. मणिपूर ५० दिवसांपासून पेटलेले आहे आणि देशाचे पंतप्रधान मात्र अमेरिकेत भाषणे देत आहेत. देशावरचे भाजपाचे हे संकट दूर झाले पाहिजे व स्वातंत्र्याचा सूर्य कायम राहिला पाहिजे.
कर्नाटकातील काँग्रेसच्या विजयाने देशात परिवर्तनाचे वारे वाहत असल्याचे स्पष्ट केले आहे. भाजपा ईडी, सीडी, सर्व यंत्रणांचा दुरुपयोग करत आहे. महाराष्ट्रातील आजचे राजकीय चित्र अत्यंत खालच्या पातळीवर गेले असून अशी परिस्थिती यापूर्वी कधीही नव्हती. विरोधकांवर दहशत निर्माण करण्यासाठी भाजपा सरकारी यंत्रणांचा वारेमाप दुरुपयोग करत आहे. काँग्रेस सत्तेत येऊ नये यासाठी भाजपा मीडिया, सोशल मीडियाच्या माध्यमातून अपप्रचार करत आहे. परंतु काँग्रेस सत्तेत यावी ही जनतेचीच इच्छा असून जनसमर्थन व आई तुळजाभवानीच्या आशिर्वादाने केंद्रात व राज्यात काँग्रेसच सत्तेत येईल.
भाजपच्या पोपटाचे विधान प्रतिक्रिया देण्याच्याही लायकीचे नाही. देशातील प्रमुख विरोधी पक्षांच्या पाटण्यातील बैठकीवर भाजपाने केलेल्या टीकेला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, पोपट काहीही बोलला की त्यावर प्रतिक्रिया देण्याची गरज नाही, त्यांचे विधान प्रतिक्रिया देण्याच्या लायकीचेही नाही. ज्या लोकांना लोकशाही मान्य नाही, वारकऱ्यांवर लाठीमार करुन महाराष्ट्राच्या संस्कृतीला गालबोट लावले, त्यांच्याबद्दल काय बोलणार ? त्यांना जर लोकशाही मान्य असती तर नवीन संसद भवनचे उद्घाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते झाले.



# खुलताबादमध्ये डॉक्टर श्यामा प्रसाद मुखर्जी यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्याच्या वतीने आज 23 जून रोजी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या पुण्यतिथी निमित्त तालुक्यातील विविध ठिकाणी पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. रत्नपूर येथे डॉ शामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी भाजपा तालुका अध्यक्ष प्रकाश वाकळे, शहराध्यक्ष सतीश दांडेकर, उपसभापती दिनेश अंभोरे, तालुका संघटन सरचिटणीस अविनाश कुलकर्णी, तालुका सरचिटणीस शिवाजी गायकवाड, गणेश सावजी, तेजस सावजी, निलेश सावजी, हर्षल गिरी, राहुल काचकर, प्रदीप ठेंगडे आदी पदाधिकारी उपस्थित होते. अशाप्रकारे तालुक्यामध्ये विविध बूथवर डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी बुथप्रमुख, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शाहू महाराज शिक्षण संस्थेत योग दिवस

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था येथे नवव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाअंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'वसुदेव कुटुंबकम' संचलित 'हर घर आंगण योग' या अंतर्गत योगदिनाचे औचित्य साधून विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते . तसेच योग शिबिराचे आयोजित करण्यात आले. भारतासारख्या अतिशय प्राचीन आणि वैभवशाली परंपरा लाभलेल्या देशात योगशास्त्राचा उगम झाला. या अतिप्राचीन अद्भुत शास्त्राची मुळे खोलवर रुजवण्यासाठी योग दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाद्वारे साधकांमध्ये योगाची आवड जन माणसांमध्ये निर्माण व्हावी, हाच खरा एकमेव उद्देश. या कार्यक्रमांतर्गत प्रार्थना, पूरक व्यायाम, आसन -दंड स्थिती ,बैठक स्थिती, विपरीत शयन स्थिति, शयन स्थिती ,प्राणायाम ,एकादश ओंकार, शांतीपाठ, घेण्यात आले. योगसंकल्प' चे वाचन करण्यात आले. संस्थेच्या आयुर्वेद महाविद्यालयात स्वस्थवृत्त व योग विभागांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले.

# चोरट्यांनी लांबविली ॲल्युमिनियमची तार

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील रेणुका ॲग्रो बायो कॉल सुलतानपूर रोड गट नंबर 574 येथून एलुमिनियम चेअंदाजे 80/100किलो वजनाचे लाईट साठी वापरण्यात येणारी तार काल रात्री अकरा वाजता दोन व्यक्तीमार्फत चोरी करण्यात आली.

चोरी करताना दोन्ही भामटे चोर सीसीटीव्हीमध्ये कैद झाले. परंतु अंधार असल्याच्या कारणाने दोघांचेही चेहरे स्पष्टपणे दिसून आले नाही चोरी ची घटना घडत असताना रेणुका ॲग्रो बायोकॉलचे अरुण नलावडे व नामदेव नलावडे यांनी मोबाईलद्वारे सीसीटीव्ही चेक केले व ताबडतोब घटनास्थळी गट नंबर 574 या ठिकाणी गेले असता सदरील इसम तो तार घेऊन पसार झाले होते. त्याचवेळी या ठिकाणाहून नामदेव नलावडे यांनी बाजार सावंगी येथील मुख्य जमादार नवनाथ कोल्हे यांना फोन तरी माहिती कळवली त्यांनी ताबडतोब त्या ठिकाणी पो ठोकळ,बनसोड साहेब, यांना पाठवले व रात्री दोन वाजेपर्यंत परिसरात चोरांची शोधाशोध सुरू होती परंतु ते तोपर्यंत चोरीचा तार घेऊन पसार झाले होते.



# अवैधरित्या वाळू उपसा करणारे ट्रॅक्टर महसूलकडून जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** शुक्रवार, 23 जून रोजी माहिति देण्यात आली की, खुलताबाद तालुक्यातील येसगाव येथील गिरजा नदी पात्रातून अनेक दिवसांपासून अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्या ट्रेक्टरला जप्त केला आहे. अनेक दिवसांपासून गिरजा नदी पात्रातून अवैधरित्या वाळू उपसा सुरु असल्याची माहिती महसूल प्रशासनाला प्राप्त झाली होती. यावर नवीनच रुजु झालेले तहसीलदार स्वरूप कंकाळ यांच्या आदेशानुसार नायब तहसीलदार प्रमोद सावंत, विनेश महेर, विलास वाहुळ, अथर्व चौधरी यांनी सापळा रचत सदरील ठिकाणी धाड टाकत कारवाई करून वाळूने भरलेला ट्रेक्टर जप्त करून तहसील कार्यालयाच्या आवरात उभा केला आहे. दरम्यान सदरील करवाईमुळे वाळू तस्करांचे धाबे दणाणले आहेत.


अर्जंट फ्लॅट विकणे आहे
नक्षत्रवाडी, छत्रपती संभाजीनगर, (महाराष्ट्र) येथील गट क्र. 8/1, समर्थ एलक्लेव्हमध्ये पहिल्या मजल्यावरील 2 बीएचके फ्लॅट अर्जंट विकणे आहे. एकूण क्षेत्रफळ 910 स्क्वेअर फूट, क्लिअर टायटल, सीएसएमएसएस कॉलेजपासून पाच ते सात मिनिटांच्या अंतरावर, रम्य वातावरणात, मेन रोडच्या अगदी जवळ.
संपर्क : मो. 7588818406

महाराष्ट्र Business Katta












# निर्मळ मनाची श्रीमंती लाभलेला निष्पाप जिव्हाळा : राजेंद्र रापतवार

संयमाचा परीघ





चित्र : बाबूराव पाटील, भोकर

प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226

भाग : ३१

आधुनिक केसरी

ससंवादाची सुरुवात : राजेंद्र रापतवार, बालपण अंबाजोगाईतच गेलं असल्यामुळं अंबाजोगाईच्या गल्ली बोळाची बारिक-सारीक माहिती असलेला भला माणुस. संत नामदेवांच्या अभंगांवर, संत असण्यावर निस्सिम भक्ती असलेला भोळा जीव. नामदेवासाठी श्रदधेनं सौभाग्यवतीसह घुमान यात्रा करुन जीवन सफल झाल्याची आनंदी धारणा बाळगणारा निरागस भक्त. नितांत निष्ठेनं परीवहन कार्यालय अंबाजोगाईतून वरिष्ठ लिपिक पदावर कार्यभार सांभाळत निश्कलंक सेवानिवृत्त झालेला भला माणूस, परीवहन महामंडळाच्या अत्यल्प सेवानिवृत्ती वेतनातही विनातक्रार लेका-सुनांच्या स्वातंत्र्याचा आदरभाव ठेवत घराचा गाडा हाकणारा कुटुंबप्रमुख. चार, वयानं लहान परंतू कर्तुत्ववान भल्यामोठ्या भावांचा थोरला दादा म्हणून कायम आदरार्थी, सहामधील चार थोरल्या आणि दोन धाकट्या बहिनींच्या मायेचा, वात्सल्याचा, स्नेहाचा, जिव्हाळ्याचा परमलाभार्थी मनुष्य. नातवंडांच्या चिवचिवाटात, लहान-थोरात रमणारी प्रसन्न वात्सल्यमूर्ती. आपलं वय ओलांडून कौटुंबिक गणगोतात, जिव्हाळ्याच्या प्रांतात विसावलेले आमचे जेष्ठ सन्मित्र आहेत राजेंद्र रापतवार. काळ वेळ कांही असो, कायम हाकेला 'ओ ' देणारा निष्पाप जिव्हाळा म्हणून ते आम्हा कवितेवर जीव ओवाळून टाकणाऱ्या वर्तुळाच्या फार जिव्हाळ्याचे आणि अर्थातच जिवाच्या फार जवळचे सन्मित्र आहेत. जवळ जवळ चार दशकांची परिवहन महामंडळातली निश्कलंक सेवा :

राजेंद्र रापतवार बसडेपोमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आणि अंबाजोगाईमधील विविध क्षेत्रांनी आपल्या सद् वर्तनाच्या बळावर ते 'जेष्ठ नागरीसंघ', 'संत नामदेव बीसी ग्रुप', 'ग्राहक पंचायतीचे संघटक', 'अंबाजोगाई मसापचे अजीव सदस्य', 'घुमान यात्रा ग्रुपचे बुजुर्ग सदस्य' अशा वेगवेगळ्या समुहांसोबत आपुलकीनं राहिले आहेत. वयाच्या ५८ व्या वर्षी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती नंतर आज ७० व्या वर्षात पदार्पण करत असताना त्यांच्या ठायी स्थायीभाव होऊन राहिलेली आपुलकी, जिव्हाळा आजही कायम आहे, हे विषेश.सेवा निवृत्त होऊनही ते परीवहन महामंडळाच्या बसेसचा विषय निघाला की फार हळवे होतात. 'शासनानं चालक, वाहकांना किती वर्षे तीन हजारावर नौकरी करायला लावायच्या' हा गंभीर प्रश्न त्यांच्या जीवाची चाळण करतो.तीन तीन वर्षे तीन हजारात गोर गरीब लेकरांनी कशा नौक-या करायच्या, कसं जीवन जगायचं, कधी लग्नं करायची, झाली असतील तर तीन हजारात कसं भागवायचं कुटुंब, हे असे भले मोठे प्रश्न फार गंभीर होऊन जातात त्यांच्या सोबतच्या चर्चेत.मागे सहा महिने बसचा संप चालला आणि लालपरीचे चाकं थांबले, कर्मचारी परेशान झाले, पोटापाण्यासाठी बांधकामांवर मोलमजूरी करु लागले, परंतू शासनाला पाझर फुटला नाही आणि मोठ्या कठोर निर्दयी मानसिकतेने तो संप अक्षरश: चिरडून, मोडून काढला त्यावेळी त्यांना हताश निराश होत असताना आम्ही पाहिलं आहे. हे 'परपीडेनं व्याकुळ होणं' हेच तर अपार करुणेचं काळीज असण्याचं लक्षण आहे. कविता लिहिण्याची पहिली पायरी. आम्ही लिहा म्हणालो महोदयांना आणि त्यांनी धाडसानं लिहिलंही त्या संदर्भात. गांभीर्यानं फेसबुकावरती आपली भूमीका लिहून मन मोकळं केलं, ज्याचा परीनाम म्हणून त्यांनी 'लालपरी'वर कविता लिहिल्या, लेख लिहिले, बातम्या शेअर केल्या, जनजागरण केलं. अंबाजोगाई बस डेपो समोरील उपोशनकर्त्यांसह सद्भावनेनं बसले आणि बसेसचा प्रश्न लोकाभिमूख केला. त्यांच्या परिवहन सेवा क्षेत्रातील निवृत्त कर्मचा-यांच्या अल्प पेन्शन मधे मंडळी कशी सन्मानानं जगत असेल शकेल, हा मोठा प्रश्न त्यांची झोपमोड करतो.एकीकडं करोडोंच्या यौजना खिरापत वाटाव्या तशा सरकार वाटतं चाललं आहे आणि दुसरीकडं बसेसला वा-यावर सोडून प्रायवेटायझेशनला रान मोकळं करुन दिलं आहे.जसजसे पगारदार नौकर सेवानिवृत्त होतील, तसतसे शासन पुर्णवेळ जागा भरेल की नाही ही भिती आहेच दबा धरुन !

आयुष्याच्या उत्तरार्धात गद्याकडून पद्याकडं झालेला आल्हाददायक जीवन प्रवास :

राजेंद्र रापतवार महोदयांना खोटं नाटं आवडंत नाही, ही त्यांची मोठीच अडचन आहे. त्याबद्दलची जितक्या लवकर होईल तितक्या तत्परतेनं ते उत्सफुर्त प्रतिक्रीया देऊन मोकळे होतात. क्षणभर राग वैताग होतो परंतू तो फार लवकर काढूनही टाकतात.वाट सुचत नसेल तर ते सरळ चर्चेला घेतात एक्सपर्ट ओपिनियन घेऊन, भिजंत घोंगडं ठेवंत नाहीत. सामोपचारानं, कौटुंबिक पातळीवर भावंडांची मतं अजमाऊन,मुलांना चर्चेत सहभागी करुन घेऊन होता होईल तेवढं लवकर वातावरण निर्मळ व्हावं ही त्यांची मनोभूमीका मला महत्वाची वाटते. समाजमन गढूळ होवू नये, ते नितळ, निर्मळ रहावं यासाठी कवितेच्या माध्यमातून समर्पक शब्द वेचले गेले पाहिजेत ही कवितेची आग्रही भूमीका त्यांना मौलिक वाटते, हा आनंद आहे.

महोदय आरंभी गद्य लिहायचे. कधी मधी गावातल्या छोट्या मोठ्या कार्यक्रमांचा धावता आढावा टिपून ठेवंत जो नंतर बातमीसाठी हमखास कामी यायचा.ही लिहीण्याची गती म्हणाल तर कोर्टातल्या जज साहेबांच्या स्टेनोटायपिस्ट पीएच्या पलिकडली, जणू कांही महोदयांनी स्टेनोचा डिप्लोमा केला आहे.पण तसं कांही नाही.महोदयांच्या अंगी असलेला 'आवडलेलं टिपून ठेवणे' हा सद्गुण आहे, जो त्यांच्या ठायी रुजलेला, मुरलेला आहे.ही गोष्ट मला फार भावली. या आणि अशा अनेक कारणांनी महोदय कवितेच्या सहवासात आले आणि आज परिस्थिती अशी आहे की ते कधी काळी गद्य लिहायचे, हे ही ते विसरले आहेत, येवढा जीव त्यांना कवितेने लावला आहे, कवितेने त्यांना लावलेला आहे. सद्गृहस्थ कवितेच्या दारी अंगणी रुळंत गेले. आज कवितेशिवाय त्यांची ना वॉट्सअपवर, ना फेसबुकावर कॉमेंट असते ना फेसबुक पोस्ट.

कवितेनं हात धरला की असंच होतं. कविता सभ्य मनुष्याची मानगुट सोडंत नाही आणि हा आनंद रापतवार महोदय पावलो पावली घेत आहेत.आज घडीला परीसरातलं कुठलंही छोटं मोठं कविसंमेलन महोदयांना आदरभावनेनं हाक मारतं आणि महोदय निसंकोच प्रतिसाद देतात. नांदेड, परळी, ० अपार आपुलकीची पुंजी त्यांच्या जवळ आहे.

मुंबई,पुणं,नांदेड,परभणी,वसमत,औरंगाबाद आणि किनवट ही गावं त्यांच्या तळपायानं गोंदून घेतली आहेत. या आपुलकीचा हलकासाही रंग कधी उडू दिला नाही. सणावाराला समारोहांना कायम रिन्युवल होत रहातं.खिशात पैसा किती यापेक्षा मनात श्रीमंती किती याचा या सद्गृहस्थाकडं मोजमाप नाही. गणगोताच्या हाकेला धावून येणारी उर्जा त्यांच्या अंगी मुरलेली आहे. गणगोताप्रती ही मनाची अमाप श्रीमंती या माणसाच्या आयुष्यात ठासून भरलेली आहे.

लेकराबाळांच्या आनंदात परमानंद शोधणारा बुजुर्ग, ही कवितेची कृपा :

राजेंद्रजी कविता लिहितात. हो लिहितात कविता.

आनंदचय. कवितेचा हात धरुन कौटुंबिक ख्याली खुशालीचा मजकुर लिहिन्यातला आनंद कळतो आहे त्यांना. ते गणगोताबद्दल, निसर्गाबद्दल, समाज बांधवांबद्दल लिहिताना मोठे भावूक होतात. नातवांचं शालेय जीवन, त्यांच्या बाललीला, शालेय संपादनूक, क्रीडा कौशल्य, काव्यलेखण या लेकरांची संवेदशीलता आणि कौशल्यविकासाला सुसंस्कारीत करणा-या गोष्टी त्यांना मोठ्या मौलिक वाटतात.अनेकदा त्यांना थोरला मुलगा पंकज आणि ज्योती पंकज यांची थोरली कन्या ऋतुजाचं सभाधीटपण आणि इंग्रजी भाषेतुन छोट्या छोट्या छान छान कविता लिहिनं मोठ्या आनंदाचा विषय असतो. नातू निरजच्या क्रिकेट आणि सायकलींगचंही मोठं अप्रूप वाटतं. नांदेडला दिलेली मुलगी संपदा आणि जावाई अंकुशराव यांचा गुटगुटीत मुलगा सोहमची बुद्धीबळात सगळ्या स्पर्धांनी अव्वल येण्याची घौडदौड आम्ही सायंशतपावली दरम्यान मिटक्या मारंत चर्चीली आहे. मुंबईत असलेला मुलगा तेजस आणि प्रियंकाचा मुलगा आदित्य जेंव्हा अमेझॉनसाठी बाल मॉडल म्हणून वस्त्र परिधानाच्या जाहिरात करताना दिसला, ते पाहून राजेंद्रजीमधील आजोबाला मनस्वी आनंदी होताना पाहिलं आहे.गौरी, श्रीनिवास हे नातरुंडंही महोदयांना प्राणप्रिय आहे. पुतन्या आशुतोषच्या मल्टीमीडीयातील नाविण्यपुर्ण करीयर बद्दलही ते आपुलकीनं बोलतात. अंबाजोगाई मसापच्या दहाव्या साहित्य संमेलना दरम्यान 'नातीस पत्र' या नाविण्यपुर्ण पत्रलेखण स्पर्धेत त्यांनी मुलगा पवन आणि सौ कल्पना पवन यांची मुलगी श्रेयाला लिहिलेलं भावपूर्ण पत्र वाचताना डोळे पानावल्या शिवाय रहीले नाहीत. नातवांबद्दल अपार आदरभाव आणि त्यांच्या संपादनुकीवर अभिमान बाळगणारा प्रेमळ, हळवा आजोबा मला त्यांच्याठायी नेहमी दिसून आला आहे. सद्गृहस्थाला मी कधीच त्यांच्या सुना सौ ज्योती पंकज, सौ कल्पना पवन, सौ प्रियंका तेजस यांच्या बद्दल तक्रार करताना अनुभवलं नाही. सास-याच्या अंगी असलेल्या या दुर्मीळ सद्गुणाचाही मोठा आदर वाटतो.मुलगी सौ संपदा आणि जावाई अंकुशराव कौरवार जे एम एस इ बी पालम येथे उपअभियंता पदावर कार्यरत आहेत त्यांच्या बद्धलहीअपार आदर अनुभुतीस आला आहे. या अशा सगळ्या भावविश्वात बुजुर्ग राजेंद्र महोदय आम्हा कविता जगणा-या मंडळी सोबत मोठ्या आनंदानं असतात. अंगी असलेल्या सत्शील स्वभावामुळं त्यांनी कवितेकडून मनं जपण्याची कलाही अलदग अंगीकारली आहे. कडवटपण, निष्ठूर ताठरता आणि अहंकारी भूमीकांनी कुटुंबाची आणि सहवासाची माती होते, हे ही त्यांनी जवळून बघितलं आहे.त्यांना जसजशी कवितेची व्यापक जनहिताची भूमीका पटंत गेली,ते अधीकाधीक गांभिर्यानं कवितेच्या नादी लागंत गेले.जे कायमच अवहेलनांनी सत्कारले, त्यांच्या बद्दल कणव आहेचय त्यांच्या मनात आणि अवघं जग सुखी रहावं ही भोळी भाबडी निर्मळ प्रार्थणाही रुजली आहे अंतरंगात सखोल. याहून वेगळं काय लागतं बरं आनंदी आयुष्य जगायला एखाद्या सज्जन सामान्य माणसाला ? राजेंद्र महोदयांनी आरंभीच्या आयुष्यात कविता जगण्याला प्राधान्य दिलं आणि आता ते आनंदानं लिहिण्यात रमले आहेत, आमच्यासाठी याहून मोठा आनंद तो कोणता ?

भावंडांचा लाडका भोळा दादा : राजेंद्रजी रापतवार भावंडांचा अभिमान बाळगणारा भाऊ या दृष्टीकोनातून बघितलं की आमचा पत्रकार सुदर्शन भाऊ, आमचा शिक्षक मैत्री संघाचा अध्यक्ष भाऊ,आमचा एअर फोर्स चा भाऊ, आमचा पब्लिक रिलेशन ऑफिसर भाऊ, आमच्या संगीतकार ओमकारचा मायाळू बाप सत्येंदू, आमचा सेवानिवृत्त वाहक आणि बावर्ची भाऊ, वसमतची दिवंगत सुलोचना आक्का, नांदेडची कमलआक्का, परभणीची सावित्रा आक्का, अंबाजोगाईची इंदू आक्का, वसमतची विद्याताई, औरंगाबादची उज्वलाताई अशी जी मालिका सुरु होते ती आपण फक्त ऐकत रहायचं, तेंव्हा या सज्जन सद्गृहस्थाचा अभिमानानं ऊर भरुन येते.आपल्या बहिनी, मेव्हणे, भाच्चे, भाच्च्या यांच्या बद्दल अभिमान बाळगणारं मोठं मन त्यांच्या ठायी आहे. आपल्या बापाचं नीतीमान संवेदनशील हाडाचं शिक्षक असणं हा तर महोदयांसाठी अपार आदराचा विषय असतो, त्यांनी कमावलेल्या इज्जतीचे त्यांचे सगळे भावंडं लाभार्थी असल्याची कृतज्ञता ते अनेकदा बोलून दाखवतात.कदाचित याहीमुळं त्यांच्या मनात शिक्षण आणि शिक्षकांबद्दल त्यांना कायम आदर राहिला आहे, त्याचं मूळही त्यांचे श्रद्ध्येय वडील आहेत. आई वत्सलाबाई आणि वडील नरहरराव गुरुजी यांच्या धाकात त्यांच्या नैतिक जीवनाची घडी बसलेली आहे. हे नैतिक वळण त्यामुळं भरकटंत नाही.

गणगोत, साहित्य, संगीत, समाजबांधवांकडून सत्तरोत्तरी सन्मान सोहळा :

काल महोदयांचा सत्तरावा वाढदिवस आम्ही अंबाजोगाईच्या सन्मित्रांनी, गणगोतांनी, संत बी सी ग्रुपच्या मान्यवरांनी मोठ्या आनंदात, कल्पकतेनं साजरा केला.महोदयांचे बंधू आणि जेष्ठ पत्रकार सुदर्शनजी रापतवार यांनी आग्रहानं स्नेहीजनांना अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय मोरेवाडी शेजारील बालाजी रेस्टॉरंटमधे खमंग मसाला दोसा खाऊ घालून आपला आनंद साजरा केला. अंबाजोगाई शिक्षक मैत्री संघाचे संस्थापक अध्यक्ष विजयजी रापतवार महोदयांनी या अनौपचारीक सन्मान समारंभाचे समयोचित प्रास्ताविक आणि सुत्रसंवादाची भूमीका आनंदानं पार पाडली. यावेळी आम्ही महोदयांच्या अवघ्या गणगोताला राजेंद्रजींच्या अंगी असलेल्या कौटुंबिक वात्सल्य, माणुसकी आणि सृजनशीलतेच्या संदर्भातील त्यांच्या विविध पैलूंचा अल्पसा प्रवाही परीचय करुन देऊन त्यांना त्यांच्या निरागस, सुबोध कविता त्यांच्या हस्ताक्षरात जतन करुन ठेवण्यासाठी पुष्पगुच्छासह देखणी डायरी आणि लेखणी भेट देऊन निर्भय, निर्मळ जीवनाच्या शतकपुर्तीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

या अनौपचारिक शुभेच्छापर अभिष्ठ चिंतनाच्या समारंभात अंबाजोगाईतील साहित्य संस्कृती निर्माण आणि जतन कार्यात हिरीरीने भाग घेणारे सदस्य जगप्रसिद्ध पखावजवादक उद्धवबापू आपेगावकर, माजी उपप्राचार्य कविवर्य भगवानराव शिंदे, कविवर्य डॉ. अनंत मरकाळे,कविवर्य डॉ दिलीप भिसे, कविवर्य राजेश रेवले, कविवर्य तथा कथाकार नागनाथ बडे, कविवर्य तथा कथाकार गोरख शेंद्रे आणि आस्मादिक मुकुंद राजपंखे सहभागी झालो होतोत.

संत नामदेव बी सी ग्रुपचे मान्यवर...

बीड जिल्हा सिंपी समाज अध्यक्ष श्री प्रविण संगेवार, शिक्षक मैत्री प्रतिष्ठान अंबाजोगाईचे अध्यक्ष विजय रापतवार, रमेश सुरावार, सचीन गिरगिरवार, नितीन गिरगिरवार, बालाजी टेंबुरवार, अनिल रापतवार, संदीप दरवेशवार, अजय रापतवार यांनीही पुष्पगुच्छ आणि प्रेमाची उबदार शाल पांघरुन रापतवार उभयतांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.

राजेंद्रजींचे सन्मित्र जफर कुरेशीजी, इंजिनियर शेख नजीब, जेष्ठ नेते श्रीरंगआबा चौधरी असा हा व्यापक विचारसरनीचा जिव्हाळा उपस्थित होता. उपस्थितांमधे राजेंद्रजींच्या श्रीमती सौ जोत्स्नाताई, बंधू जेष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार, महोदयांचा थोरला मुलगा पंकज, सौ ज्योती पंकज, नातवंडं कु ऋतुजा आणि निरज, मेहुणे तुळशीदास पोटपल्लेवार, सुरेश पल्लेवार, दिगांबर दरवेशवार, विश्वनाथ गिरगिरवार, युवा संगीतकार ओमकार संत्तेंदू रापतवार ही मंडळी अंतःकरणपुर्वक उपस्थीत होती.

(लेखक मराठी भाषेचे साहित्यिक तथा इंग्रजी भाषा आणि साहित्याचे संशोधन मार्गदर्शक आहेत)









**तुमचा शतकमहोत्सवी वाढदिवस साजरा होवो !**

कुणाची कुचिनींदी नाही ना कुणाशी कसलं वैर, सगळ्यांशी आदरभाव जपणं हे जणू जगण्याचं व्रत आहे या भावनेनं गावात सगळ्या उपक्रमांनी आपुलकीनं सहभागी होणारा सद्गुणी मन त्यांच्याकडं आहे .आजही गणगोतातील ओमकारची बुजुर्ग आज्जी, विजयजींचे कर्तुत्ववान वडील, आई, आणि किनवटचे सत्शील सासरे यांच्या प्रती नितांत आदरभाव जाणवतो .धन्वंतरी डॉ बिराजदार सर, अंबाजोगाईचे माजी नगराध्यक्ष महादू मस्के साहेब, चनईचे बुजुर्ग मित्र दरवेशवार, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य बाबासाहेब ठोंबरे सर अशी किती तरी माणसं महोदयांच्या जीवनाचा अविभाज्य घटक झाले आहेत .आम्हा साहित्याशी संबंधीत सन्मित्रांचे ते निरागस मित्र आहेत .त्यांच्या वयाच्या जेष्ठतेच्या सगळ्या काट्या त्यांनी आस्मादिकासह रोज चार किलोमिटर शतपावली करुन टाकून दिल्या आहेत .रोज ताजा ऑक्सिजन, रोज ताजी तवानी अक्षरपूजा असा परीपाठ ठरलेला असतो .हा जीवन प्रवास असाच अखंड प्रवाहित राहून शतकमहोत्सवी होवो हीच हार्दिक शुभेच्छा !

महोदय ! आपल्या लिहिल्यानं जग उलतं पालथं नक्कीच होणार नाही हे खरंच परंतू हे ही तितकंच खरं की आपलं मन नक्की पुलकित प्रसन्न रहाणार आहे . तुम्ही तर निष्पाप मनं दुखावणारं कधीच कांही लिहिलंही नाही, कसल्या खुरापती काढल्या नाहीत की कुणाला ठसका बसंल असलं वाटंणही कांडलं नाही . मुळात तो तुमचा स्वभावही नाही . त्यामुळं आपण आपलं निरोगी कुटुंबासाठी, निर्मळ समाजासाठी, निरागस बालकांसाठी, नितांत सुंदर निसर्गासाठी, गणगोतातील बळ देणा–या बुजुर्गांसाठी लिहित रहा ! चार चांगली वाक्ये, ओळी लिहिल्यानं तुम्हाला आनंद वाटतो ना, मनातून प्रसन्नता जाणवते ना, मग निर्भयपणे, निसंकोच गणगोताच्या, मित्रपरीवाराच्या, तुमच्या नितळ निर्मळ आठवनींबद्दल, भवतालाबद्दल, अपार श्रद्धेय नामदेवाच्या मानतावादी श्रद्धेबद्दल आणि एकुनातच सर्वव्यापी चांगुलपणाबद्दल लिहित रहा ! आम्ही सगळे आहोतच आपल्या सोबत !

# बांधवांनो वृक्षतोड थांबवा



बुध्दभूषण कांबळे
संपर्क क्र. : ७४९८७१५६६१

आधुनिक केसरी

**निसर्ग आपल्याला भरभरून फळे व फुले देतो. आपण त्याच्या अंगाखांद्यावर विविध खेळ खेळत असतो. त्यासोबत मनसोक्त जगत असतो.निसर्ग आपला सोबती व जीवन दाता व गुरू आहे. आपल्याला सावली देणारा सावली दाता आहे..तो सन्मार्ग दाखवतो. पण लक्षात कोण घेतो?... आज हाच माणूस आपल्या उपकारकर्त्यावर उलटला आहे.त्याची कत्तल केली जात आहे. अमापपणे वृक्षतोड केली जात आहे...वृष तोडण्यास शासनाने बंदी जरी घातली असली तरी छूप्या मार्गाने का होईना पण वृक्षतोड मोठ्या प्रमाणात केली जात आहे...अवकाळी पावसाने निसर्गाप्रमाणेच माझ्या अंतर्मनाला मोहविले आहे.**

झिमझिमणाऱ्या पावसात सृष्टीचे सुजलाम सुफलाम रूप न्याहाळताना नकळत तुकाराम महाराजांचे भावमधूर काव्य आणि स्वरसम्राट मोहम्मद रफी यांच्या सुरेल स्वरांचा साज लाभलेले कर्णमधूर गीत ऐकून कान टवकारतात

**'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे |**
**पक्षीही सुस्वरे आळवीती ॥**

वृक्ष आणि वेली निसर्गाचे सर्वोत्तम वरदान. संथपणे एका लयीत बरसणाऱ्या पावसाच्या सरींनी बहरलेल्या सृजनशील निसर्गाच्या सान्निध्यात सृष्टीचा दृक्‌श्राव्य अनुभव घेता यावा, यासारखे भाग्य ते कोणते? मनातील आठवणींची पिसे भिरभिरू लागली.

धरणीमातेने मुक्त हस्ते बहाल केलेला मौल्यवान खजिना म्हणजे वृक्ष आणि वेली. 'परोपकाराय फलन्ति वृक्षाः' या शब्दात वृक्षांचा गौरव केलेला आहे. निसर्ग आणि मानव यांच्यातील स्नेहसंबंध फार पुरातन कालापासून आहे. अगदी अनादी कालापासून निसर्ग मानवाचा मित्र आहे. वृक्ष ही निसर्गाने मानवाला दिलेली देणगी आहे.

अलीकडे पर्यावरण प्रदूषणाविषयी बरेच काही वर्तमानपत्रातून वाचायला मिळते. प्रदूषणाचे दुष्परिणाम आता सर्वत्र मोठ्या प्रमाणात जाणवू लागले आहेत. आपण ज्या पृथ्वीवर राहतो त्याच पृथ्वीचा, मानवाने सुरू केलेल्या जंगलतोडीमुळे पृथ्वीचा समतोल बिघडत चाललेला आहे.

निसर्ग आपल्याला भरभरून देतो. माणूस त्याच्या अंगाखांद्यावर जगतो आहे. निसर्ग आपला गुरू आहे. तो सन्मार्ग दाखवतो. पण लक्षात कोण घेतं आज हाच माणूस आपल्या उपकारकर्त्यावर उलटला आहे. माणसाने निसर्गाला विद्रूप करायचा जणू चंगच बांधला आहे. एकेकाळी वैभवशाली असलेल्या निसर्गाला अवकळा येत चालली आहे. मानवी मन हे निसर्गदत्त आहे. आजच्या या यंत्रयुगीन युगात तो यंत्रांच्या जंजाळात जेवढा अधिक अडकतो तेवढेच त्याचे मन निसर्गाकडे खेचले जाते. म्हणून तर डेरेदार वृक्षाच्या सान्निध्यात त्याचे मन सुखावते. निसर्गाच्या ओढीने मन त्याचे आसुसते.

आज प्रमाणाबाहेर जंगलतोड होत आहे. प्रदूषण, अवर्षण, जमीनीची धूप या संकटांना आपणच आमंत्रण देत आहोत. निसर्गाचे संतुलन बिघडण्यास कोण जबाबदार याचा सखोल विचार होत आहे का? दिसेल त्या झाडावर घाव घालायचे आणि मिळणाऱ्या जागेत घरे, कारखाने उभारायचे हे काम माणसांनीच सुरू केले. पैसा कमावणे हे आजच्या युगाचे एकमात्र ध्येय झाले आहे. पैशाच्या मागे लागत असताना आपण ज्या झाडाच्या आश्रयाला आहोत त्याच झाडावर आघात करून आपला सर्वनाश करून घेत आहोत, हे माणसाच्या लक्षात येत असेल पण मनातला लोभ त्याला स्वस्थ बसू देत नाही. सुंदर निसर्गाला आता विनाशाची घरघर तर लागणार नाही ना? मनात शंकेचे काहूर निर्माण होते. असे असेल तर लोभी माणूसच निसर्गाच्या घरघरीला कारणीभूत आहे.

यंदा उन्हाळ्यात तापमान पंचेचाळीशी ओलांडण्याच्या मार्गावर झुकू लागले. पाऊस वेळेवर पडत नाही. वैश्विक तापमानाची समस्या भेडसावत आहे. हिमशिखरे वितळत आहेत. समुद्राच्या पातळीत वाढ होत आहे. वृक्ष लागवड आणि वृक्ष संवर्धन काळाची गरज आहे. नाहीतर एकेकाळच्या जंगलांच्या ठिकाणी आगामी काही वर्षांनी वाळवंटे बनतील. जमिनीसाठी, सत्तेसाठी नव्हे तर पाण्यासाठी माणसा-माणसांत युद्धे होतील. आज जिथे तिथे इमारतींची जंगले दिसत आहेत. सिमेंटच्या जंगलात मुक्त



निसर्गसौंदर्याचा शोध घेणे म्हणजे जणू वाळवंटात हिरवळ शोधणे! आजचा माणूस खूप कर्तृत्वशाली पराक्रमी आहे. निसर्गाला लागणारी घरघर फक्त मानवच थांबवू शकतो. हे अशक्य नाही. माणसाने या बाबतीत आता अंतर्मुख होण्याची वेळ आली आहे. एका बाजूला 'झाडे लावा, झाडे वाचवा'चे नारे पिटतात आणि दुसरीकडे माणसंच झाडांवर आघात करतात. झाडांना आपण 'सोयरे, वनचरे' मानतो ना? मग त्याची काळजी घेणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. झाडे स्वतःसाठी नव्हे तर भावी पिढ्यांच्या सुखासाठी, समृद्धीचे जीवन देण्यासाठी झाडांना संरक्षणाचे दान तरी द्यावे. पशूपक्षी, प्राणी, वन यांचं संरक्षण, संवर्धन करून आपल्याच बांधवांना वाचवायचे.

प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावावे. रोपं लावण्याबरोबर ती कशी जगतील याचीही खबरदारी घेतली पाहिजे. संगोपन केले पाहिजे. नाहीतर वनमहोत्सव साजरे करायचे. मोठमोठ्या मंत्र्यांना, आमदारांना आमंत्रित करायचे. त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करायचं. 'झाडे लावा, झाडे जगवा, भूमी तगवा', घोषवाक्यांचा पुकारा करायचा. वर्तमानपत्रात ठळक बातम्यांसह छायाचित्रं प्रसिद्ध करायची आणि पुढच्या वर्षी 'जैसे थे' स्थिती. याला काय अर्थ आहे?

भविष्यात वृक्ष टिकले नाहीत तर आपणही टिकणार नाही. मुलांप्रमाणे झाडांचीही काळजी घेणे गरजेचे आहे. निसर्गाबरोबर राहण्यासाठी वृक्षलागवड ही सुवर्णसंधी आहे. वृक्ष माणसाचे जीवन फुलांनी सुगंधित करून फळांनी रसभरित करतात. पण मानव वृक्षतोड करून आपल्याच पायावर कुऱ्हाड मारून घेतो. त्यामुळे वृक्षारोपण ही नितांत गरज ठरली आहे. आपले जीवन आनंदमय, चैतन्यमय होण्यासाठी झाडं वाचवा. असे प्रयत्न केले तर पदराआड दिवा जपल्याप्रमाणे सृष्टी आपल्यावर मायेचे छत्र सदैव ठेवील. आम्हा सर्वांवर तिची असीम कृपादृष्टी राहील.

निसर्ग आपल्याला शिकवतो. पण आपण समजून घेत नाही. निसर्गाशी मैत्री करणेच हितावह आहे. निसर्गाची ताकद अफाट आहे. निसर्गाशी शत्रुत्व केले तर तो त्याची ताकद दाखवतो. कुठंतरी त्सुनामी येते. भुकंप होतात व सर्व उध्वस्त होतं. होत्याचं नव्हतं होतं. 'निसर्ग कोपला' असं म्हणण्यापेक्षा याला आपण किती कारणीभूत आहोत याचा प्रामुख्याने अंतर्मुख होऊन विचार करणे शहाणपणाचे ठरेल. खरोखरच आज अशी वेळ आली आहे की माणसाने आत्मपरीक्षण करणे अनिवार्य आहे. आपण सगळे.

**झाडे लावू पाणी घालू|**
**वृक्षसंवर्धन करू॥**
**निसर्ग रंगात मिसळू|**
**पर्यावरण समतोल साधू|**
**वृक्षवल्लींना साथ देऊ|**
**हरितक्रांतीचे गीत गाऊ॥**
**निसर्गात नंदनवन फुलवू|**
**जगण्याचा आनंद मिळवू॥**

# पत्रसंवादातून उलगडला साहित्यप्रवास



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**लेखक , कवी, चित्रकार, उत्तम आस्वादक आणि कलासक्त व्यक्तिमत्त्व रामदास खरे यांचे 'पत्रास कारण की...' हे पुस्तक म्हणजे साद - प्रतिसादाचा अनमोल ठेवा आहे. खरे यांचे हे १४ वे पुस्तक आहे. लेखक खरे यांना साहित्याची प्रचंड आवड असल्याने अनेक साहित्यकृती ते वाचत आणि त्या लेखकाला, कवीला लेखन आवडल्याचं कळवण्यासाठी ते आवर्जून पत्र लिहित असत.**

एखाद्या साहित्यिकाला त्यांची साहित्यकृती वाचून अभिप्राय कळवणं ही आजकाल दुर्मिळ गोष्ट झाली आहे पण लेखकाने ती आवड कायम जपली आहे. आणि एके दिवशी घरी पत्र आलं ते खुद्द 'विशाखाकार' , ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या कुसुमाग्रजांचं !

कुसुमाग्रजांच्या हस्ताक्षरातील पत्र वाचून लेखकाला अत्यानंद झाला आणि इथून पुढे हा पत्रांचा सिलसिला सुरु राहिला. या पत्राच्या आठवणी , त्या पत्रामागची गोष्ट लेखस्वरुपात 'पत्रास कारण की' या सदरात 'दैनिक महाराष्ट्र दिनमान' मध्ये प्रसिद्ध झाले. वर्षभरात महाराष्ट्र दिनमान वर्तमानपत्रात ३५ लेख प्रकाशित झाले आणि याच लेखांचं हे पुस्तकरूप तयार झाले आहे. आतापर्यंत लेखक खरे यांच्याकडे अनेक दिग्गजांची ३५० पत्रे हस्ताक्षरासहित संग्रही आहेत. या पत्रांसोबतच्या आठवणी, विविध लेखक, कवी, कवयित्री, नाटककार यांचा एकूण साहित्यप्रवास 'पत्रास कारण की ' या लेखसंग्रहातून अगदी मुद्देसूद मांडलेला आहे. 'पत्रास कारण की ' पुस्तकात एकूण ४३ दिग्गज साहित्यिकांचे व्यक्तिमत्त्व लेखकाने उलगडून दाखवले आहे. लेखाच्या सुरुवातीला संबंधित लेखकाच्या पुस्तकातील काही भाग किंवा कवितेच्या ओळी , त्यानंतर त्या लेखकाचा थोडक्यात जीवनप्रवास , त्यांचा साहित्यिक प्रवास, त्यांचा संघर्ष , त्यांचे प्रकाशित साहित्य , त्या साहित्याला लाभलेल्या महत्त्वाच्या पुरस्कारांची यादी आणि सोबत त्या लेखकाचे हस्ताक्षर असलेले पत्र सोबत त्या लेखकाचे छायाचित्र. वाह.... ! लेखनाची विशिष्ट पद्धत आकर्षक वाटते. उतस्फूर्त आणि ओघवत्या, प्रवाही लेखनशैलीमुळे वाचताना कुठेही मन भरकटत नाही. या पुस्तकातील वैशिष्टय म्हणजे लेखांची यथार्थ शीर्षके. त्या शीर्षकांमधून एकूणच त्या लेखकाचे व्यक्तित्वविशेष, लेखणीचं सामर्थ्य प्रतिबिंबित होते. या पुस्तकात पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, द .भा. धामणस्कर, श्री. वा. नेर्लेकर गुरुजी, मारुती चितमपल्ली, पद्मश्री डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, के. ज. पुरोहित, वसंत आबाजी डहाके, प्रेमानंद गज्वी, रत्नाकर मतकरी, डॉ. रंगनाथ पठारे, राजन खान, भारत सासणे, पद्मश्री ना. धो. महानोर, अशोक नायगावकर, माधव कोंडविलकर, सुरेश खरे, माधव वझे, वसंत लिमये, अनंत सामंत, विश्वास पाटील, डॉ. जयंत नारळीकर, जोसेफ तुसकानो, निरंजन घाटे, डॉ. यशवंत पाठक, डॉ. अनंत देशमुख, दिलीप प्रभावळकर, शिरीष कणेकर, अशोक चिटणीस , मुरलीधर गोडे, डॉ. र . म . शेजवलकर.. काय ! नावे वाचूनच उत्सुकता वाढली असेल ना ! या साहित्य क्षेत्रातील उत्तुंग व्यक्तिमत्त्वांविषयी जाणून घेण्याची उत्सुकता अधिकच वाढत जाते.

सोबतच स्त्री लेखिकांपैकी डॉ. विजया राजाध्यक्ष, डॉ. प्रभा गणोरकर, आशा बगे, गिरिजा कीर, अरुणा ढेरे, डॉ. अंजली किर्तने, वीणा गवाणकर, विद्या बाळ, डॉ. वीणा देव, मंगला गोडबोले, लीला शहा इत्यादींच्या एकूणच कार्याची ओळख या पुस्तकातून नेमकेपणाने करून दिली आहे.

या पुस्तकातले विशेष म्हणजे, प्रत्येक लेखात खरे यांनी दिलेल्या त्या - त्या लेखकाच्या साहित्यसंपदेची यादी. त्यांमुळे मूळ पुस्तके वाचण्याची उत्सुकता आणि जिज्ञासा निर्माण होते.




आमच्यासारख्या नव्या पिढीला साहित्य क्षेत्रातील विविध साहित्यिकांचा परिचय या पुस्तकाच्या माध्यमातून करून घेता आला. मुख्य म्हणजे काळाच्या ओघात ज्यांचे साहित्य ठराविक सीमारेषेपुरतं मर्यादित राहिले किंवा प्रसिद्धीपासुन फारकत घेतल्याने , समीक्षकांनी योग्य ती दखल न घेतल्याने जे साहित्यिक या तेजापासून लांब राहिले, त्या साहित्यिकांना आणि त्यांच्या साहित्यकृतींना प्रकाशझोतात आणण्याचं कार्य लेखक खरे यांनी या पुस्तकाद्वारे केले आहे. लेखकांच्या स्व- हस्ताक्षरातील ही पत्रे पाहताना प्रत्येकाचं व्यक्तिमत्व, त्यांच्या वळणदार अक्षरातून व्यक्त होणाऱ्या त्यांच्या संवेदना आणि त्यांच्या शब्दभावना असा पत्ररूपी आशीर्वाद मिळवणारे लेखक खरे खरेच भाग्यवान ! साहित्याचा अभ्यास करणाऱ्या नव्या पिढीला या लेखकांचे साहित्य अभ्यासायला आहे पण त्यांचं अक्षर कसे होते ? हे पाहता येणं तसे दुर्मिळच . पण 'पत्रास कारण की ' पुस्तकामुळे हा महत्त्वपूर्ण दुर्मिळ ऐवज नव्या पिढीला अनुभवायला मिळेल, याचा आनंद आहे. लेखक खरे यांच्या पत्र संग्रहाच्या छंदामुळे त्यांनी किती मोलाचे अक्षरधन संकलन केले आहे, याची जाणीव आता होऊ लागली आहे.


या लेखकांसोबतच्या रम्य अशा आठवणी, त्यांना भेटण्यासाठी केलेली धडपड , उदा : द . मा. धामणस्कर यांच्या भेटीचा योग, नेर्लेकर गुरुजींच्या सहवासातील मनभावन आठवणी, त्यांच्या निष्ठावान कार्याची महती , द . मा. मिरासदार यांची मिशकिली, राजन खान यांच्यातील माणुसपण जपणारा लेखक, रत्नाकर मतकरींसोबतच्या भेटीचा किस्सा आणि असे बरेचसे किस्से, आठवणीं आणि स्मृती जागवण्यासाठी 'पत्रास कारण की' संग्रही असायलाच हवे. 'व्यास क्रिएशन्स' या प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या पुस्तकाचे मुखपृष्ठ मिलिंद नार्वेकर यांनी समर्पक साकारले आहे. तसेच ज्येष्ठ लेखिका, समीक्षक डॉ. विजया टिळक यांनी या पुस्तकाची मनभावन अशी पाठराखण केली आहे. 'कैलिडोस्कोप' आणि 'पत्रसंवादु' या लेखसंग्रहाला मिळालेला प्रतिसाद याही संग्रहाला लाभेल अशी खात्री आहे. वाचनाची गोडी असणाऱ्या, रसिक वाचक तसेच साहित्य अभ्यासक, मराठी साहित्यात रुची असणाऱ्या आजच्या तरुण पिढीला हे पुस्तक अत्यंत उपयुक्त आणि मार्गदर्शक आहे. असा अक्षय्य आठवणींचा ठेवा आपल्या बुकशेल्फमध्ये विराजमान व्हायलाच हवा. **( पत्रास कारण की / लेखक रामदास खरे / प्रकाशक : व्यास क्रिएशन्स / पृष्ठे : २५० / मूल्य : ३७५ रुपये )**

# मुंबई झोपडपट्टीमुक्त होणार का ?

आधुनिक केसरी

मुंबई महापालिकेवर सत्ता मिळवण्यासाठी राजकीय पक्षांकडून मोर्चेबांधणी सुरू असतानाच सत्ताधारी राज्य सरकारने मोठा निर्णय जाहीर केला आहे झोपडपट्टीत राहणाऱ्या नागरिकांनाचे पुनर्वसन करण्यासाठी राबवल्या जाणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतंर्गत अडीच लाखात घर देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात असला तरी एसआरएमार्फत झोपडपट्टीधारकांना अगोदर मोफत आणि आता अडीच लाखात घरे मिळणारं असल्याचे राज्य सरकारने म्हंटले आहे मात्र मुंबईतील जुन्या चाळींची उपेक्षा होत आहे हे नजरेआड करता येत नाही १९९६ मध्ये सत्तेत आलेल्या युती सरकारने मुंबई महापालिका हद्दीतील झोपड्या हटवण्यासाठी हा निर्णय घेतला होता. युती सरकारने झोपडपट्टीमुक्त मुंबई करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजना, ज्याला एसआरए म्हणून ओळखलं जातं ती सुरू केली होती पण त्याला यश आले नाही पुन्हा सत्ताधारी सरकारने आगामी मुंबई महानगरपालिका निवडणूक डोळ्यासमोर ठेवूनचं हा निर्णय घेतला आहे हे मात्र नक्की झोपडपट्टी वासियांना घरं देण्यासाठी आणलेली या योजनेमागील मतांचं राजकारण सतत चर्चेत राहिलं आहे. युती सरकारच्या काळात 1 जानेवारी 1995 पर्यंतच्या झोपडपट्ट्यांना संरक्षण दिले होते. नंतरच्या आघाडी सरकारने झोपडपट्टी धारकांना मोफत घरं देण्याची घोषणा केली होती. झोपू योजनेच्या आडून मत आपल्या बाजूने खेचण्याचं हे राजकारण महाराष्ट्रात दोन दशकांहून अधिक काळापासून सुरू आहे हे वास्तव नाकारता येत नाही !

**राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**



# ओलावा असल्याशिवाय पेरणी करु नये

## तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरातील नागरिकांनी जमिनीत पुरेसा ओलावा असल्याशिवाय कापुस सोयाबीन, तुर, मुंग, उडीद बियाण्याची पेरणी करू नये, असे आवाहन सोयगाव कृषी विभागाच्या वतीने तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया यांनी खरीप हंगाम सन २०२३ - २४ निमित्त शेतकऱ्यांना करण्यात आले आहे. शेतकऱ्यांची शेतातील जमिनीची ओल ४ ते ६ इंच किंवा १०० मि.मी. पाऊस शेतकऱ्यांनी कोणत्याही बियाण्याची पेरणी करू नये, जमिनीमध्ये पुरेसा ओलावा नसताना पेरणीची घाई केल्यास जमिनीतील उष्णतेमुळे पेरलेले बियाण्याचे अंकुरण होणार नाही किंवा अंकुरण होऊन जळण्याची भीती आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट येण्याची शक्यता नाकारता नाही. शेतकऱ्यांचा वेळ व आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शेतकरी बांधवांचे आर्थिक नुकसान होऊ नये याकरिता सोयगाव कृषी विभागाच्या संदेशानुसार १०० मी.मी. पाऊस झाल्याशिवाय पेरणी करु नये असे तालुका कृषि अधिकारी मदन सिसोदिया यांनी सांगितले. पाऊस पडल्यानंतरच किंवा जमिनीची ओल ४ ते ६ इंच किंवा जमिनीमधील उष्णता जाईपर्यंत शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये काही शेतकरी धूळ पेरणी करीत असल्यामुळे शेतकरी बांधवाना विनंती करण्यात येते की, आपण कोणत्याही पिकाची पेरणी करू नये. खरीप हंगामातील सर्व पिके जमिनीत पुरेशी ओल म्हणजेच जमीन ४ ते ६ इंच ओल झाल्याची खात्री करूनच पेरणी करावी. खरीप हंगाम सन २०२३ मध्ये मुबलक प्रमाणात बियाणे व रासायनिक खताची उपलब्धता झालेली आहे. तसेच सोयगाव बियाणे, खते व किटकनाशके यांच्या गुणवत्ता व पुरवठा संबंधी तक्रार निवारण सुविधा केंद्राची केली असून तसेच तक्रार सोयगाव तालुकास्तरावर सुध्दा नोंदविता येईल सोयाबीन बियाणे शेतकऱ्यांनी बरेच क्विटल राखून ठेवलेले असून घरगुती बियाण्याची बीज उगवण क्षमता चाचणी करून बीज प्रक्रिया करून मगच पेरणी करण्यात यावी. कापूस बियाणे पाकिटे बाजारात उपलब्ध असून बरेच कापूस बियाणे पाकिटे सोयगाव तालुक्यात विक्री झालेले आहे. शेतकरी बंधूना आवाहन करण्यात येते कि, कापूस बियाणे मध्ये सर्वच वाण हे उत्कृष्ट दर्जाचे असून भरपूर प्रमाणात उत्पन्न देणारे आहे. सोशल मिडिया तसेच अफवांवर शेतकरी बंधू यांनी विश्वास ठेवू नये व विशिष्ट वाणाचा आग्रह न धरता जादा दराने कापूस बियाणे खरेदी करू नये. जर तालुक्यातील कृषि केंद्र परवानाधारकाकडून बियाणे व रासायनिक खताची खरेदी करतांना कमाल विक्री किंमत पेक्षा जादा दराने केंद्रावर विक्री करीत असल्याचे निदर्शनास आल्यास आम्हालाही कळवा शेतकरी बंधुना आवाहन करण्यात येते की, खरीप हंगाम सन २०२३ मध्ये मुबलक प्रमाणात सर्व प्रकारचे रासायनिक खते उपलब्ध आहे. तरीही काही कृषि सेवा परवानाधारक शेतकऱ्यास मागणी केलेल्या रासायनिक खतासोबत इतर खते कृषी सेवा केंद्र धारक देत असल्यास आमच्या कडे तशी तक्रार दाखल करण्यात यावी सोयगाव तालुक्यात कृषी विभागाच्या वतीने पथके तैनात करण्यात आली आहे शेतकऱ्यांनी संपर्क साधावा असे आवाहन तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया व मंडळ अधिकारी आर. जी. गुंडिले सोयगाव कृषी विभाग यांनी केले आहे.

# पिलीव येथील अहिल्या चौकातील काम पूर्ण करा

आधुनिक केसरी न्यूज

**माळशिरस :** पंढरपूर-म्हसवड राज्य महामार्ग क्रमांक 548A या महामार्गाचे पुणे येथील रोडवेज या कंपनीने सान-2017 साली काम सुरी केले आहे.परंतु रोडवेज या कंपनीने एवढी मोठी यंत्रणा असूनही अगदी संत गतीने काम सुरू ठेवले असल्याने वारंवार या कंपनीवर लवकर काम करत नाही व काम संत करणे सुरू आहे असे आरोप होत होते. जवळ-जवळ सहा वर्षापासून हे काम सुरू आहे तरीही आध्यापही काही ठिकाणची फुलाची व इतर डागडुजीची कामे अपुर्णच आहेत. सध्याच्या काळात अखंड महाराष्ट्राचे दैवत असलेल्या पंढरीच्या विठुरायाच्या भेटीला संपूर्ण महाराष्ट्रातील वेगवेगळ्या ठिकाणाहून पायी दिंड्या सह वारकरी चालत निघाले आहेत या सर्व पायी चालत निघालेल्या वारकऱ्यांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी प्रत्येक गावातील संबंधितांचे युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. संपूर्ण गावे त्यांच्या स्वागतासाठी सज्ज आहेत परंतु माळशिरस तालुक्यातील पिलीव या गावातूनही पंढरपूर-म्हसवड महामार्गावरुन लहान-मोठ्या अशा एकुण 24 दिंड्या पायी चालत जातात परंतु पिलीव येथील मुख्य अशा अहिल्या चौकातील पंढरपूर-म्हसवड या रस्त्याचे काम रखडले असून रस्त्या लगतचे दुकानदार व ये-जा करणारे ग्रामस्थ,विद्यार्थी धुळीने त्रस्त झाले आहेत या ठिकाणी एका बाजूला चढ तर एका बाजूला उतार अशी रस्त्याची अवस्था करून ठेवली आहे.रस्त्याचे काम अर्धवट ठेवल्याने या ठिकाणी अनेक लहान मोठे अपघात झाले आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी लवकरात लवकर पाठपुरावा करून रस्त्याचे काम त्वरित पूर्ण न केल्यास पिलीव येथील भारतीय जनता पार्टी या पक्षाच्या वतीने पंढरपूर-म्हसवड या राज्य महामार्गावर भव्य असा रस्ता रोको करणार असल्याचे भारतीय जनता पार्टीचे पिलीव शहराध्यक्ष राजेंद्र करांडे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# कै. विश्वनाथराव नळगे विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिवस शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** उत्कृष्ट योगशिक्षक तथा योगाचार्य हनुमंत ढगे यांच्या कणखर मार्गदर्शनाखाली भाजपा जिल्हा उपाध्यक्ष तथा कै. वि. नळगे विद्यालयाचे संस्थापक, अध्यक्ष केरबा दादा बिडवई, प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली कै. विश्वनाथराव नळगे विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. आंतरराष्ट्रीय योग दिवस शिबिरासाठी शाळेत मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते, ह्या वर्षी योग दिवसाची थीम"""वसुदेव कुटुंम्बकम """ म्हणजेच विश्व ही माझे घर हे होते, असे संचालक लक्ष्मीकांत सावकार बिडवई यांनी सांगितले, तसेच योग गुरू हनमंत ढगे यांनी विद्यार्थ्यांचा योगा घेतला व योगामुळे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य चांगले राहते, शरीराला रोगमुक्त करण्याचे काम योगा करतो तसेच कॅन्सर बीपी शुगर यासारखे अनेक असाध्य रोग बरी होतात असे मार्गदर्शन केले. **करो योग रहो निरोगी भारत की शान है योग गीता, वेद, पुराण है योग सबका कल्याण है योग सफलता की कुंजी है योग** याप्रसंगी उपस्थित प्रवीण पाटील चिखलीकर , संस्थेचे संस्थापक अध्यक्ष केरबा दादा बिडवई सावकार, सचिव अशोकराव चालीकवार, गटविकास अधिकारी गोपाळ कल्हारे, गटशिक्षणाधिकारी सतीश व्यवहारे, विस्ताराधिकारी सर्जेराव टेकाळे , मा. नगराध्यक्ष किरण वट्टमवार, मा. उपनगराध्यक्ष मुकदम, युवा नेते, संस्थेचे संचालक लक्ष्मीकांत बिडवई सावकार, राहुल बिडवई, उत्कृष्ट योगशिक्षक तथा मुख्याध्यापक वैजनाथ खेडकर सर, प्रविण धुतमल, अविनाश पवार, बाळु पवार, शहाजी पवार, व्यंकटेश जंगले, सुरेश गायकवाड, मिलिंद खरोटे, मुख्याध्यापक विलास नागेश्वर सर, प्रा. मु. अ. ठाकूर सर, पर्यवेक्षक माळवदकर सर, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व शाळेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.





# वाशी तालुक्यातील दसमेगाव जिल्हा परिषद शाळेत मुलांना दिले योगाचे धडे

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दसमेगांव शाळेत योगदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. योगशिक्षक भागवत बगाडे व प्रशांत जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या प्रांगणात योगप्रकाराचे धडे देण्यात आले. शिक्षक भागवत बगाडे, प्रशांत जाधवर यांनी मुलांना योगाचे प्रात्यक्षिक करून दाखविले. ताडासन, वृक्षासन, धनुरासन, मत्सासन, विहंगासन, पद्मासन, त्रिकोनासन , शिर्षासन, सूर्यनमस्कार, भ्रामरी, कपालभाती, ओमकार, शवासन, इत्यादी आसन प्रकारासह प्राणायम करून योगदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. योगदिन यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक हरिभाऊ रणदिवे, सुहास नन्नवरे, दिपक पांचाळ , मंजूषा कवडे , चंदा सुरवसे आदींनी प्रयत्न केले.

# खंडाळ्यात २७ रोजी बौद्ध समाजाचा मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** काही दिवसांपूर्वी नांदेड जिल्ह्यातील बोंढार हवेली या गावातील अक्षय भालेराव या बौद्ध युवकाचा खून करण्यात आला होता.राज्य भरातून या निर्घृण घटने बद्दल ठीक ठिकाणी आंदोलनाच्या माध्यमातून तीव्र निषेध व्यक्त करणारे पडसाद उमटले.खंडाळा येथे तालुक्यातील बौद्ध समाज बांधवांच्या वतीने भव्य जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले आहे. दिनांक २७ जून रोजी खंडाळा एसटी स्टँड परिसरातून थेट तहसील कार्यालयापर्यंत भव्य जनआक्रोश मोर्चा येऊन धडकणार आहे. याबाबतचे निवेदन खंडाळा तहसीलदार आणि खंडाळा पोलीस ठाणे यांना देण्यात आलेले आहे. बोंढार, जिल्हा नांदेड येथील बौद्ध युवक अक्षय भालेराव याने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केल्याचा राग मनात धरून त्याच गावातील जातीयवादी उच्च जातीच्या युवकांनी अतिशय क्रूरपणे अक्षय भालेराव याचा खून केला आहे.



# नवीन पीक कर्ज तत्काळ सुरू करा

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने रांजणी येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेसमोर नवीन पीक कर्जासाठी आंदोलन करण्यात आले. सततच्या नापिकीमुळे व नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडलेला आहे. कधी अस्मानी तर कधी सुलतानी संकटाला शेतकऱ्यांना सामोर जावे लागत आहे, असे असले तरी अजून काही शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदानाची रक्कम जमा झालेली नाही. नवीन पिक कर्जासाठी शेतकऱ्याने अर्ज केलेल्या असून अद्याप त्यांना पीक कर्ज मिळालेल नाही. यासाठी रांजणी भागातील सर्व शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन यावेळी झोनल विभागाला पीक कर्ज अन्य मागण्याचा निवेदन देण्यात आले. मागण्यावर लवकरात लवकर विचार न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी शेतकरी व युवा शेतकरी संघटनेच्या वतीने देण्यात आला.





# वैजापुरात पोलिसांचे पथ संचलन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** आषाढी एकादशी व बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर बुधवार (ता.२१ )रोजी आय. पी.एस. अधिकारी पोलीस उपअधिक्षिका महक स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक संजय लोहकरे यांच्या उपस्थितीत पोलीस पथ संचलन पोलीस स्टेशन ते मुख्य रस्ते यावरून करण्यात आले, शहरातील कायदा व सुव्यवस्था टिकून राहावी यास्तव हे पथ संचलन करण्यात आले. या प्रसंगी शांतता समिती सदस्य धोंडीरामसिंह राजपूत, सखाहरी बर्डे, अकिल शेठ,उप मुख्याधिकारी राहुल साठे, मिलिंद साठे सह स.पो. नि. व पोलीस उप निरीक्षक यांची उपस्थिती होती.




# नूतन तहसीलदार अजित पाटील यांचा रोपटे देऊन सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :**काही दिवसांपूर्वीच अजित पाटील हे नूतन तहसीलदार म्हणून खंडाळ्यात रुजू झालेले आहेत.विविध राजकीय पक्ष विविध सामाजिक संघटना तसेच विविध क्षेत्रातील लोकांकडून त्यांचे स्वागतपर सत्कार केले जाते आहे.झाडे लावा झाडे जगवा हा संदेश देत खंडाळा तालुक्याचे नुतन तहसीलदार अजित पाटील यांचा प्रहार अपंग संघटना ता.खंडाळा व आम आदमी पार्टी पदाधिकारी यांच्या मार्फत स्वागत करताना गुलाबाचे छोटंसं वृक्ष देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रहार संघटना खंडाळा तालुका अध्यक्ष प्रवीण फडतरे, प्रहार अपंग संघटना महिला अध्यक्ष समिना शेख,किशोर जमदाडे व आम आदमी पार्टी वाई- विधानसभा युवा अध्यक्ष, साहिल भोसले, हितेंद्र पवार, प्रमोद फडतरे उपस्थित होते.

तहसीलदार पदाकडे सर्वसामान्य लोकांच्या जीवनात अनन्यसाधारण महत्व असते.आमचे प्रश्न आमचे तहसीलदार असा विश्वास जनतेने वाटत असतो.जनतेच्या प्रश्नांच्या अनुषंगाने सुद्धा पदाधिकाऱ्यांनी तहसिलदार यांच्या समवेत संवाद साधला. पदाधिकाऱ्यानी नवनिर्वाचित तहसिलदार यांच्या समवेत दिव्यांगाच्या,जनतेच्या विविध प्रश्नांवर चर्चा केली. जनतेचे विविध प्रश्न सोडविले जातील असे तहसीलदार अजित पाटील यांनी दिले.

# पंढरपूरसाठी २९० जादा बसेस

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** आषाढी एकादशीनिमित्त विठुरायाच्या दर्शनासाठी आसुसलेल्या वारकऱ्यांना पंढरपूर येथे पोहचविण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या नाशिक विभागानेही नियोजन केले आहे. विभागातून २५ जून ते चार जुलै या कालावधीत पंढरपूरसाठी २९० जादा बससेवा सोडण्यात येणार आहे. आषाढी एकादशीला पंढरपूरला मोठी यात्रा भरते. २९ जून रोजी आषाढी एकादशी आहे. तसेच तीन जुलै रोजी गुरूपौर्णिमा आहे. या काळात पंढरपूरकडे असणारी यात्रेकरूंची ओढ लक्षात घेता नाशिक विभागाच्या वतीने जादा बससेवेचे नियोजन करण्यात आले आहे. नाशिक (एक) आणि नाशिक (दोन) आगार, महामार्ग बसस्थानक, मालेगावातील नवीन बस स्थानक, सटाणा, नामपूर, देवळा, ताहाराबाद, मनमाड, चांदवड, सिन्नर, वावी, लासलगांव, विंचूर, निफाड, चांदोरी, नांदगाव, इगतपुरी, घोटी, येवला, कळवण, वणी, पिंपळगाव बसवंत, ओझर येथून जादा बस सोडण्यात येणार आहेत. महामंडळाच्या मनमाड आगाराकडून मनमाड-पंढरपूर ही विशेष बससेवा सुरू करण्यात आली आहे. मनमाड येथून सकाळी साडेसात आणि दुपारी साडेतीन वाजता ही बस सुटणार आहे. आषाढी एकादशी निमित्ताने शहर आणि ग्रामीण भागांतील भाविकांना पंढरपूर येथे जाण्यासाठी २१ जूनपासून जादा बससेवा सुरू करण्यात आल्या आहेत.

भाविकांचे दर्शन सुखकर व्हावे, यासाठी मनमाड आगारातर्फे विशेष नियोजन करण्यात आले आहे. ज्या गावातून थेट पंढरपूरसाठी ४० किंवा अधिक प्रवासी असतील, त्यांच्यासाठी थेट गावातून बस उपलब्ध करून देण्यात येत आहे. या बससेवेला राज्य परिवहन महामंडळाच्या महिला सन्मान योजनेंतर्गत दिल्या जाणार्या ५० टक्के सवलतीचा तसेच ६५ ते ७५ वर्षाच्या ज्येष्ठ नागरीकांना ५० टक्के सवलतीचा व अमृत ज्येष्ठ नागरीक योजनेंतर्गत मोफत प्रवास सुविधेचा प्रवाशांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन मनमाड बस आगारप्रमुख अभिजित चौधरी यांनी केले आहे.



२५ जूनला एक, २६ तारखेला चार, २७ जूनला दोन, २८ तारखेला सहा, २९ जूनला पाच, ३० जून आणि एक जुलैला प्रत्येकी एक, तर दोन जुलै रोजी एक बस असे पंढरपूर बससेवेचे नियोजन मनमाड आगारातून करण्यात आले आहे . प्रवाशांकडून सुरक्षित प्रवास म्हणून नेहमीच एसटीला प्राधान्य दिले जाते . पंढरपूरची आषाढी यात्रा हा महाराष्ट्रांतील जनतेचा जिव्हाळ्याचा विषय असतो . आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर येथे जाणार्या भाविकांची संख्या जास्त असते . त्यासाठी ही सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे .

# केंद्रीयमंत्री दानवेंनी लुटला स्नेहभोजनाचा आनंद

## भोकरदन तालुक्यात महा-जनसंपर्क अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. बाळासाहेब बोराडे**

**श्रीक्षेत्र राजूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने नऊ वर्षे पूर्ण केले.त्यानिमित्ताने भाजपने महा-जनसंपर्क अभियानाला सुरवात केली आहे. मोदी सरकारची उपलब्धी सर्वसामान्यापर्यंत पोहचविण्याची जबाबदारी केंद्रीय मंत्र्यांवर सोपवली आहे. त्याचाच एक भाग म्हणून भोकरदन तालुक्यातील नळनी येथे केंद्रीय रेल्वेमंत्री रावसाहेब दानवे यांच्या मार्गदर्शनानुसार महा-जनसंपर्क अभियान बैठक संपन्न झाली. यावेळी दानवेंनी कार्यकर्त्यांसह डबा पार्टीत सहभाग घेऊन स्नेहभोजनाचा आनंद लुटला. भोकरदन तालुक्यात महा-जनसंपर्क अभियानाच्या माध्यमातून नळणी बु.आणि राजुर जिल्हा परिषद गटाची बैठक केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात पार पडली.याप्रसंगी भाजप जिल्हाध्य आ.संतोष दानवे,भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्तेही मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना दानवे म्हणाले की मोदी सरकारच्या काळात अनेक जनकल्याणकारी योजनाच्या माध्यमातून विकासात्मक कामे पूर्ण झाली.पीएम आवास,उज्जवला गॅस, हर घर जल, किसान सन्मान योजना, आयुष्यमान भारत यासारख्या योजना निर्माण झाल्या. तसेच विमानतळ, रेल्वे मार्गाचे विद्युतीकरण व राष्ट्रीय महामार्गाचा विकास होऊन पायाभूत सुविधा वेगाने निर्माण होत असल्याचे दानवे यांनी सांगितले. त्यामुळेच मोदी सरकारच्या काळात भारत जगातील पाचवी मोठी अर्थव्यवस्था म्हणून उदयास आला, असे प्रतिपादन केंद्रीय रेल्वेमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी केले. महा-जनसंपर्क अभियानांतर्गत सामूहिक भोजन व डब्बा पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी



आ.संतोष पाटील दानवेंसह कार्यकर्त्यांनी आपापल्या घरून जेवणाचा डबा बनवून आणला होता. कार्यक्रम संपल्यावर केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवेंनी डबापार्टीत सहभाग नोंदवला. पंगतीत बसून कार्यकर्त्यांसोबत स्नेहभोजनाचा आस्वादही घेतला. या डबा पार्टीत भाजप जिल्हाध्य आ.संतोष पाटील दानवेंही सामील झाले होते. या कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते रामदास साबळे, शालिकराम जाधव, गणेश महाराज साबळे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये जाहिर प्रवेश केला. यावेळी जिल्हा परिषद सदस्य डॉ.चंद्रकांत साबळे,माजी जि.प.सदस्य कमलाकर साबळ,मार्केट कमिटी चेअरमन मुकुंदराव मुगुटवार,राजूर सर्कलचे ज्येष्ठ कार्यकर्ते जगनराव पवार,रामदास तळेकर,भगवानराव नागवे,माजी सभापती गजानन नागवे,माजी सरपंच भाऊसाहेब भुजंग, गजानन नागवे, प्रल्हाद गाडेकर,ग्रा.पं.सदस्य पंढरीनाथ करपे,विनोद डवले,मुसा सौदागर,राहूल दरख,मेस्टा जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर पुंगळे,बाळू मापारी,रतन ठोंबरे,अर्जुन मांगडे,कैलास जाधव यासह नळणी व राजुर गटातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोंदिया येथे धान खरेदी केंद्रांची तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** यावर्षी धान खरेदीतील घोटाळे रोखण्यासाठी पणन महासंघाकडून पावले उचलण्यात आली आहेत. धान खरेदी केंद्रांची सातत्याने तपासणी केली जात आहे. गोंदिया जिल्ह्यातील १७७ केंद्रांची तपासणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मुंबईतर्फे ४ भरारी पथके पाठविण्यात आली आहेत. चार उड्डाण पथकांचे पथक १७७ केंद्रांची तपासणी करत आहेत. जिल्ह्यात पणन महासंघ व आदिवासी विकास महामंडळाकडून धान खरेदी करण्यात येत आहे. जिल्ह्यात जिल्हा मार्केटिंग फेडरेशनने १७७ केंद्रांना मान्यता दिली आहे. शासनाच्या नियमानुसार आधारभूत किमतीवर अधिकृत धान खरेदी केंद्रांवरून धानाची खरेदी केली जाते. केंद्रांद्वारे खरेदी केलेला धान महामंडळाकडून राईस मिलर्सना वाहतुकीसाठी दिला जातो. गेल्या काही वर्षांपासून जिल्ह्यातील धान खरेदी केंद्रांवर मोठ्या प्रमाणात खरेदी केलेल्या धानाचा गंडा घातल्याचे प्रकरण समोर आले. यापूर्वीच्या हंगामात धान खरेदीनंतर अनेक गोदामांत धानच नसल्याचे दिसून आले होते. त्यामुळे संस्था दोषी आढळल्यामुळे काही केंद्रांवर फौजदारी कारवाई करण्यात आली तर काही केंद्रांवरून नुकसानीची रक्कमही वसूल करण्यात आली. जिल्हा पणन संघामार्फत सध्या रब्बी हंगामात गोंदिया जिल्ह्यातील १७७ केंद्रांवर धान खरेदी करण्यात येत आहे. त्यानुसार भविष्यात घोटाळे टाळण्यासाठी दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. मार्केटिंग फेडरेशन मुंबई मार्फत केंद्रांवर लक्ष ठेवले जात आहे. जिल्ह्यातील केंद्रांची तपासणी करण्यासाठी राज्यस्तरावरून ४ उड्डाण पथके जिल्ह्यात पाठविण्यात आली आहेत. जिल्ह्यात दाखल होणारी चारही उड्डाण पथके आपापल्या केंद्रांची तपासणी करत आहेत. उड्डाण पथकाची तपासणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर केंद्रनिहाय अहवाल महासंघाला सादर केला जाईल. त्यामुळे उड्डाण पथकाच्या देखरेखीखाली जिल्ह्यातील धान खरेदी आणि मध्यवर्ती धानसाठ्यात आणखी घोटाळे समोर येणार का, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# विक्रेत्यांकडून खंडणी घेणारे चार गुंड तडीपार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** सिंहगड रस्ता भागातील भाजीपाला, खाद्यपदार्थ विक्रेत्यांना धमकावणाऱ्या चौघांना पोलीस उपायुक्त सुहेल शर्मा यांनी तडीपार करण्याचे आदेश दिले. गणेश पांडुरंग चोरगे ( वय २३, रा. चरवड वस्ती, वडगाव बुद्रुक, सिंहगड रस्ता ), करण अर्जुन दळवी ( वय १९ ), मनोज नागराज कट्टीमणी ( वय २१, रा. भैरवनाथनगर, किरकिटवाडी, सिंहगड रस्ता ), दिनेश लक्ष्मण ढवळे ( वय २३, रा. सावित्री अपार्टमेंट, हिंगणे खुर्द, सिंहगड रस्ता ) अशी तडीपार करण्यात आलेल्यांची नावे आहेत. चोरगे, दळवी, कट्टीमणी, ढवळे सिंहगड रस्त्यावरील खाद्यपदार्थ, भाजीपाला विक्रेते, तसेच व्यावसायिकांना धमकावून पैसे उकळलत होते. त्यांना पुणे शहर, परिसरातून तडीपार करण्याचा प्रस्ताव सिंहगड रस्ता पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरक्षक अभय महाजन, गुन्हे शाखेचे निरीक्षक जयंत राजूरकर, उपनिरीक्षक गणेश मोकाशी, मीनाक्षी महाडिक, स्मिता चव्हाण, प्रथमेश गुरव यांनी केला होता.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# पुस्तकी ज्ञानाबरोबर माणसे वाचायला शिका : सुरेश कोते

आधुनिक केसरी न्यूज

**अकोले :** आज ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था स्त्रियांवर अवलंबून असून सावित्रीबाई फुले यांच्या त्यागातून आज मुली मोठ्या संख्येने शिक्षण घेत आहेत , पूर्वी मेरिट मधील वा पहिले आलेले विद्यार्थी हे नंतर जीवनात कुठेच अपवाद वगळता दिसले नाहीत म्हणून पुस्तकी ज्ञानाबरोबर समाजातील वास्तववादी ज्ञान आत्मसात करून समाजातील माणसे वाचावयास हवीत असे उदगार लिज्जत पापड समूहाचे कार्यकारी संचालक सुरेश कोते यांनी काढले. श्री अगस्ति एज्युकेशन सोसायटीच्या अगस्ति विद्यालयाच्या 57 व्या वर्धापन दिनानिमित्त इयत्ता 10 व 12 वी गुणवंत , 5 वी व 8 वी शिष्यवृत्ती परीक्षा पात्र आणि NMMS परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगी केशवबाबा चौधरी हे होते. सुरेश कोते पुढे म्हणाले , एखाद्या संस्थेचा, शाळेचा 50 वर्षानंतर वर्धापनदिन साजरा करणे सोपी गोष्ट नाही. संस्थेचे संस्थापक गुरुवर्य बा ह नाईकवाडी तथा बाबा यांनी केलेला त्याग व महान कार्य यातून या संस्थेचा डोलारा उभा आहे म्हणून तर या विद्यालयातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने शिक्षण घेताना दिसत आहेत. या विद्यालयात विविध उपक्रमाबरोबर गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत असल्याने बाबांच्या नंतरही आज 57 वा वर्धापनदिन मोठ्या आनंदाने आपण साजरा करतो आहोत.संस्था



चालविणे हे जिकिरीचे काम बनले असून संस्थेच्या सेक्रेटरी मातोश्री दुर्गाबाई नाईकवाडी , सतीश नाईकवाडी , शिरीष नाईकवाडी अध्यक्षा शैलजा पोखरकर या सर्वांनी अतिशय मेहनतीने हे काम पुढे नेण्यासाठी झोकून दिले आहे.
संस्थेचे कार्याध्यक्ष सतीश नाईकवाडी यांनी आपल्या भाषणात विद्यालयाच्या गुणवत्तेची परंपरा कायम टिकून असल्याचे सांगत बाबांच्या अथक परिश्रमातून आणि संस्कारातून संस्था वाटचाल करते आहे असे स्पष्ट करत शिस्त आणि गुणवत्ता यात संस्थेचा लौकिक जपण्याचे काम अविरतपणे सुरू असल्याने समाधान व्यक्त केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात योगी केशवबाबा चौधरी यांनी बाबांच्या कार्याची माहिती देत मातृभूमीची सेवा करतानाच बहुजनांची शिक्षणाची सोय व्हावी , यासाठी सदैव झपाटून काम करणारे बाबा हे आपल्या सर्वांचे प्रेरणास्थान आहेत.विद्यालयाने सातत्याने सर्वच बाबतीत आपली गुणवत्ता सिद्ध केली असल्याने बाबांना अपेक्षित असणारे काम तेवढ्याच ताकदीने सुरू असल्याने आनंद होत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. 10 वी व 12वी गुणवंत विद्यार्थी , शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थी तसेच NMMS पात्र विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते गौरविण्यात आले .याप्रसंगी संस्थेचे कार्याध्यक्ष शिरीष नाईकवाडी , पत्रकार संघाचे अध्यक्ष विजय पोखरकर ,माजी नगरसेवक प्रमोद मंडलिक, प्रा विजय भगत, सचिन शिंदे,दत्ता ताजणे , अण्णासाहेब शेटे,उपमुख्याध्यापिका सुजल गात, यांचेसह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य शिवाजी धुमाळ यांनी तर सूत्रसंचालन बी एम पवार यांनी केले आणि आभार पर्यवेक्षक संजय शिंदे यांनी मानले .

मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती छत्रपती संभाजीनगर

जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली,
शहागंज गांधी पुतळ्याजवळ, छत्रपती संभाजीनगर मो : 9422201977

**Walsekar Metal Private Limited**

Manufacturer of Aluminium Alloy Cas ting

Address : K-58, MIDC AREA WALUJ, AURANGABAD-431136



# लुटमार करणारा तालुका पोलिसांच्या ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुका पोलीस - स्टेशनच्या हद्दीत असणाऱ्या हरण्यामाळ परिसरात एका व्यक्तीला लाथा बुक्क्यांनी मारहाण करत लुटल्याची घटना घडली होती. याप्रकरणी तालुका पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने पोलीसांनी तपासाची चक्रे फिरवीत चोवीस तासात तीन आरोपींना मुद्देमालासह ताब्यात घेतले आहे. २४ तासातच गुन्हा उघडकीस आनल्याने पोलीस अधीक्षकांनी तालुका पोलिसांचे कौतुक केले आहे

विशाल वामन मालचे वय २३ रा. नगाव बारी धुळे, अजय जोंधळे वय २३ रा. नगाव बारी धुळे, ज्ञानेश्वर उर्फ भूपेंद्र विश्वनाथ गोसावी वय २५ रा. नगाव बारी धुळे असे ताब्यात घेतलेले आरोपींची नावे आहे. आरोपींनी गुन्ह्याची कबुली केली असून त्यांच्याकडील ४३ हजार रुपयांचा मुद्देमाल तालुका पोलिसांनी हस्तगत केला आहे. ताब्यात घेतलेल्या आरोपींनी या अगोदर देखील रस्ता लूट केल्याची कबूली दिली असून त्या गुन्ह्याची उकल होण्याची देखील शक्यता पोलीस अधीक्षकांनी वर्तवली आहे. कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी साजन सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक अनिल महाजन पोलीस उपनिरीक्षक पोलीस उपनिरीक्षक राजश्री पाटील, राकेश मोरे, अमोल कापसे, धीरज शिंगाने, धीरज सांगळे, कांतीलाल शिरसाट, प्रमोद पाटील, नितीन दिवसे आदींच्या पथकाने केली आहे.

# रेल्वेतून उडी मारून आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :**येरवडा भागात राहणाऱ्या १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला सावत्र आई आणि वडील हे सतत मानसिक, शारीरिक त्रास देत असायचे. या त्रासाला कंटाळून धावत्या रेल्वेमधून उडी मारून तिने आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत मुलीच्या आईचे निधन झाल्यानंतर आरोपी वडिलाने आरोपी सावत्र आईशी लग्न केले. त्यानंतर वडील आणि सावत्र आई हे दोघे मृत मुलीला घरातून बाहेर पडू देत नव्हते. तिला शिक्षण घेऊ देत नव्हते आणि मारहाण करीत होते. या सततच्या त्रासाला मुलगी कंटाळली होती.



# बोलेरो जीप ट्रकवर आदळून चार जण जागीच ठार

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा येथून परत येत असताना घुगूसजवळ वाहन दुभाजकावर आदळून उभ्या ट्रकला जबर धडक दिली. या भीषण अपघातात मारेगाव येथील चौघेजण जागीच ठार झाले. ही घटना आज शुक्रवारी दुपारी २ वाजता दरम्यान घडली. अपघातात रफीक नबी वस्ताद शेख, त्यांची पत्नी संजिदा रफीक शेख, युसूफ नबी वस्ताद शेख, त्यांची पत्नी मुमताज युसूफ शेख रा.मारेगाव हे जागीच ठार झाले. या अपघाताने मारेगाव शहरात हळहळ व्यक्त होत आहे. हे कुटुंब गुरुवारी आपल्या नातेवाईकांच्या साक्षगंधाला राजुरा (जि. चंद्रपूर) येथे गेले होते. ते आज मारेगावकडे बोलेरो (क्रमांक एम.एच.२९, बी. सी. ६३२१) ने येत असताना घुग्गुस नजीक हे वाहन दुभाजकावर आदळून रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या उभ्या ट्रकला धडकले. या अपघातात बोलेरो वाहनाचा चक्काचूर होऊन यातील मारेगावचे दोन सख्ख्ये भाऊ व त्यांच्या पत्नीचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात एवढा भयावह होता की वाहनाचे प्रत्येक भाग गॅस कटरने कापून मृतकांना बाहेर काढण्याचे नियोजन सुरू आहे. दरम्यान मृत रफीक शेख यांच्या पश्चात एक मुलगा एक मुलगी आहे, तर युसूफ शेख याच्या पश्चात दोन मुली आहे.

# ईटोली येथील योगवर्धिनी उपकेंद्रावर आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** तालुक्यातील ईटोली येथे योगवर्धिनी उपकेंद्रावर अंतर आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग शिबिरास मोठ्या प्रमाणात उत्साहात साजरा करण्यात आला. अंतरराष्ट्रीय योग दिना निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.
योगा आपल्या दैनंदिन जीवनामध्ये आपण नियमित योगासने केल्यास शरीर सशक्त व चपळ आणि लवचिक बनतात त्यांचबरोबर शरीराचे स्नायू बळकट बनतात व शरीराला योग्य प्रकारचे ठेवण तयार होते. योगा करणे हे आपल्या जीवनासाठी खूप महत्त्वाचे आहे. परंतु योग करताना योगाची योग्य पद्धत समजून घेऊन योग करणे आपल्या शरीराला फायदेशीर ठरते. योग म्हणजे शरीराचा व्यायाम नसून योग मानवी मन आणि आत्मा यांची क्षमता



जाणून घेणाऱ्या विज्ञानाचा एक भाग आहे. योग अभ्यासातून मानवी जीवनशैलीचा परिपूर्ण सारांश प्राप्त होतो. आपल्या शरीरातील आणि मनातील ताणतणाव दूर करायचा असेल तर त्यासाठी योग फायदेशीर ठरतो. योगातील ध्यान प्राणायाम आणि योगासने नियमित केल्यानंतर तणावापासून मुक्ती मिळते असे मत योग शिक्षक बी.डी. रामपूरकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजन आरोग्य विभाग परभणी व तालुका आरोग्य अधिकारी डॉ.बोराळकर यांच्या मार्गदर्शनाखाली ईटोली येथील आरोग्यवर्धिनी उपकेंद्र डॉ. स्वाती आघाव यांच्या उपस्थितीत करण्यात आले, याप्रसंगी योगवर्धिनी उपकेंद्रातील डॉक्टर सौ.स्वाती आघाव, आरोग्य सहाय्यक पोले तर गावचे सरपंच व प्रतीष्ठीत नागरीक जगदिश घुगे,शरद आप्पा तीळकरी,साईबाबा विद्यालयाचे स्वामी सर,आशाताई,आगंनवाडीताई , सहभागी झालेले होते त्याचबरोबर अनेक महिला व नागरिक मोठ्या संख्येने शिबिरात उस्फूर्तपणे उपस्थित होते.

# योग जीवनशैली म्हणून स्वीकारा, तुमच्या क्षमता वाढू लागतील : डॉ. चारुलता रोजेकर

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** योग साधनेत माणसे बदलण्याची क्षमता आहे. त्याला आपला दैनंदिन जीवनाचा भाग म्हणून स्वीकारा, तुमच्या क्षमता वाढू लागतील असे मत डॉ. चारुलता रोजेकर यांनी मंगळवारी सांगितले.

खेळाडूंसाठी कार्य करणाऱ्या क्रीडा भारती या संस्थेतर्फे 'क्रीडा भारती योग पुरस्कार' देऊन मंगळवारी (ता. २०) डॉ.चारुलता रोजेकरांना सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार वितरण सोहळा हेडगेवार रुग्णालयातील दामूअण्णा सभागृहात माजी विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर यांच्या हस्ते पार पडले. यावेळी विभागीय संघचालक बबनराव जागडे, हेडगेवार रुग्णालयचे अध्यक्ष डॉ. सतीश कुलकर्णी, योगाचार्य डॉ. उत्तम काळवणे, क्रीडा भारतीचे प्रमुख पंकज भारसाखळे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

डॉ. चारुलता रोजेकर यांना अकरा हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह पुरस्कार रूपाने देण्यात आले.

आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. रोजेकर म्हणाल्या, 'योग साधनेत माणूस बद्दलण्याची ताकद आहे. जो योग जीवनशैली म्हणून स्वीकारेल त्याला आपल्या क्षमता वाढीस लागताना दिसतील. आज विविध पद्धतीने योग साधना केली जात असली तरी त्या सर्वांचा गाभा हा एकच आहे. योग क्षेत्रात मी अपघाताने आले. वयाच्या सातव्या वर्षी झालेला माझा एक अपघात माझे आयुष्य बदलणारा ठरला. तेव्हा डॉक्टर म्हणाले की मी फार शारीरिक कष्ट करू शकणार नाही. पण योग्य साधनेतून मी आजपर्यंत ५२ हजार लोकांना योग शिकवण्याचे कार्य केले आहे'. डॉ. भापकर यांनी आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा देत सांगितले की, योग्य शिकणे सोपे आहे पण योग जीवनशैली म्हणून जगणे कठीण काम आहे. पुणे, परभणी सारख्या जिल्ह्यांमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करताना एक हजार शिक्षक योग प्रशिक्षित करता आले आणि त्यांच्या माध्यमातून ८ लाख विद्यार्थ्यांपर्यंत योग्य नेता आला, याचा आनंद आहे. पंकज भारसाखळे म्हणाले, खेळाडू आणि प्रशिक्षकांचा सन्मान हा नित्याने होतच असतो. मात्र योग क्षेत्रात योगदान देणाऱ्या लोकांचा पण सन्मान करता यावा म्हणून हा पुरस्कार सुरू करण्यात आला. भविष्यात योग आणि विविध खेळाडूंसाठी 'क्रीडा भारती' आगामी काळात अनेक कार्यक्रम घेणार आहे.

चाटे स्कुलच्या योग विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिकांनी कार्यक्रमाची सुरुवात झाली. योग प्रशिक्षक अंजली देशपांडे, कैलास शिवणकर, ज्ञानेश्वर वाघ, प्रमिला आव्हाळे यांचा देखील सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. संदीप जगताप यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विनायक राऊत, बाळासाहेब वाघमारे, गणपत पवार आदींनी परिश्रम घेतले.



# मोलखेडा येथे जय भवानी हायस्कूलमध्ये योग दिन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा येथे 21 जून रोजी जय कालिका देवी शिक्षण संस्था संचलित जय भवानी विद्यालयात हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज मोलखेडा येथे प्राचार्य सुनील काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील मुले व मुली तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी योग साधना व प्राणायाम काळाची गरज ओळखून या राष्ट्रीय समारंभामध्ये अतिशय उत्साहाने व कार्य तत्परतेने सहभाग घेऊन हा कार्यक्रम शाळेत मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेचे प्रा. मदन पा. डोखले सर यांनी मुलांना योग योग्य पद्धतीने करण्यासाठी सहकार्य केले व योगशिक्षकांची भूमिका निभावली. डोखले यांनी योगाचे महत्त्व विशद करताना योगा आता जीवनाचा अविभाज्य भाग व्हायला हवा. अनादी काळापासून साधुसंतांनी योगाचे महत्त्व पटवून दिले, धकाधकीच्या जीवनात योगा गरजेचे आहे. त्याशिवाय रोगमुक्त विद्यार्थी व भारत हे सूत्रच आता आपण मुलांमध्ये रुजवायला हवे स्कॉलर विद्यार्थी निर्माण करायचे असतील तर विद्यार्थ्यांनी सुद्धा योग आत्मसात करून योग साधने शी एकनिष्ठ व्हावे व योग करावा, असे प्रतिपादन केल यावेळेस अमोल कोलते पाटील अमोल गवई, सुनील पावर, अर्जुन महले, शेनसिंग आझूडे, गजानन पवार, भरत शिंदे, प्रदीप जाधव, अमोल वानखेडे, धनराळे, गोपाळ राठोड गावातील सर्व सरपंच ज्ञानेश्वर वारंगणे, स्वानंद पाटील, गुलाबराव नाराजपूत, रवींद्र गायकवाड, शिवाजी गांवन्डे, मुकुंदा पाटील, मख सर, विशाल अंगाईत, कैलास शेळके,भिवा इंगळे व इतर गावकरी मंडळी सामाजिक कार्यकर्ते यांनी केले. याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक कर्मचारी उपस्थित होते अशी माहिती पत्रकार बंधू अज्ञानसिंग चव्हाण यांनी दिली.याप्रसंगी ग्रामस्थ, विद्यार्थी, शिक्षकवृंद व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# शाहीर-पत्रकार डॉ. शेषराव पठाडे यांना सिनीअर रिसर्च फेलोशिप जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यातील ज्येष्ठ पत्रकार व शाहीर डॉ. शेषराव विश्वनाथराव पठाडे यांना "महाराष्ट्राची शाहिरी परंपरा : एक चिकित्सक अभ्यास" या विषयावरील संशोधनासाठी भारत सरकारच्या सांस्कृतिक विभागाची (सीसीआरटी) सिनीअर रिसर्च फेलोशिप जाहीर झाली आहे. डॉ. पठाडे हे लोककलेचे अभ्यासक म्हणून ओळखले जातात. लोकनाट्य, लावणी-तमाशा, शाहिरी परंपरा हे त्यांचे विषय. शाहिरी कलेच्या माध्यमातून त्यांनी असंख्य प्रबोधनपर कार्यक्रम सादर केलेले आहेत. नाट्यशास्त्र, पत्रकारितेत शिक्षण घेतलेल्या पठाडे यांनी "पेशवेकालीन शाहिरी वाङ्मयातील संवाद : एक अभ्यास" या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून पी. एचडी. संपादन केली आहे. गेल्या २८ वर्षांपासून पत्रकारितेत कार्यरत असणाऱ्या पठाडे यांनी विविध दैनिकांत काम केले आहे. सध्या दैनिक पुण्यनगरीच्या मराठवाडा आवृत्तीत स्पेशल रिपोर्टर म्हणून कार्यरत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या विभागातही डॉ. पठाडे तासिका तत्त्वावर सहाय्यक प्राध्यापक म्हणून अध्यापनाचे कार्य करतात. याशिवाय त्यांनी विविध ठिकाणी लोककलेवरील कार्यशाळा, चर्चासत्रात सहभाग नोंदविला आहे. या संशोधन कार्यासाठी त्यांना आदरणीय गुरुवर्य डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. वि. ल. धारूरकर, माजी कुलगुरू डॉ.सुधीर गव्हाणे, ज्येष्ठ शाहीर अंबादास तावरे, मधुकर सेठ नेराळे, डॉ. प्रकाश खांडगे, डॉ. गणेश चंदनशिवे, डॉ. संभाजी खराट यांचे मार्गदर्शन लाभत आहे.





# छावणीमध्ये जागतिक योग दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** छावणी परिषद, औरंगाबाद आणि गरवारे कम्युनिटी सेंटर छावणी यांच्या संयुक्त विद्यमाने कॅन्टोन्मेंट इंग्लिश मिडीयम स्कुल, छावणी येथे जागतिक योग दिनानिमित्त योगा प्रोटोकॉल (शिष्टाचार) प्रमाणे अभ्यासक्रम घेण्यात आला. यामध्ये , प्रार्थना, सूक्ष्म व्यायाम, पूरक हालचाली, ताडासन, वृक्षासन, पादहस्तासन, अर्ध चक्रासन, त्रिकोनासन, दांडासन, भद्रासन, वज्रासन, अर्ध उस्ट्रासन, शशांकासन, उत्तान मांडुकासन, वक्रासन, पोटावर झोपून करावयाची आसने, कपाल भारती, प्राणायाम, ध्यान, सूर्यनमस्कार, संकल्प शांती पाठ इत्यादी योगासने प्रकार शास्त्रोक्त पद्धतीने प्रशिक्षक सुमित जाधव यांचे मार्गदर्शन खाली घेण्यात आले. याप्रसंगी छावणी परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय सोनवणे, कार्यालय अधीक्षक वैशाली केनेकर, डॉ.धामणे, रमाकांत रौतले, शाळेच्या मुख्याध्यापिका प्रियंका तारगे कार्यालयीन कर्मचारी, शिक्षक, व विद्यार्थी उपस्थित होते, याप्रसंगी संजय सोनवणे यांनी दैनंदिन जीवनातील योगासनाचे महत्व या बद्दल उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमाकांत रौतले यांनी तर आभार वैशाली केनेकर यांनी मानले कार्यक्रमाच्या शेवटी मान्यवरांच्या हस्ते उपस्थित विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले या कार्यक्रमासाठी कुणाल पाटील, संतोष बन्सीले, प्रथमेश गरड यांनी पुढाकार घेतला.

# बारबालावर उधळल्या लुटीच्या नोटा

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** एका वृद्ध व्यवस्थापकाला लुटल्यानंतर बारबालावर लाखो रुपये उधळणाऱ्या दोघांना जरीपटका पोलिसांनी मुंबईत अटक केली. दोघांच्या मुसक्या आवळल्यानंतर त्यांना नागपुरात आणले. न्यायालयाने दोघांनाही एक दिवसाची पोलीस कोठडीत सुनावली. तपीश बागडे आणि रुषभ कावळे, रा. जरीपटका अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. पाचपावली पोलीस ठाण्याअंतर्गत राणी दुर्गावती चौकात गजभिये यांची भारत गॅस एजन्सी आहे. एजन्सीत पखाले (६०) हे व्यवस्थापक म्हणून काम करतात. शनिवार १७ जुनला दुपारच्या सुमारास तीन लाखांची रक्कम घेवून एजन्सीतून स्कुटीने निघाले. लघूवेतन कॉलनीच्या मार्गावरून जात असताना डॉ. आंबेडकर रुग्णालयाच्या मागच्या भागात आरोपी त्यांच्या मागावर होते. एकाने त्यांच्या दुचाकीला लात मारली. त्यामुळे दुचाकीचे संतूलन बिघडून ते खाली पडले. त्याच वेळी त्यांच्या जवळील तीन लाख रुपये लुटले आणि पळाले. या प्रकरणी जरीपटका पोलिसांनी गुन्ह्याची नोंद करून तपास केला. मात्र, आरोपींचा काही सुगावा लागला नाही. दरम्यान आरोपी मुंबईतील एका हॉटेलमध्ये थांबले. एसीची हवा आणि चविष्ट भोजनावर ताव मारायचे.





# गिरिजा पात्रातून गाळ उपसा सुरु

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यातील गाळ वाहतूक सुरू झाली आहे. पावसाने उघडीत दिल्याने शेतकऱ्यांना गाळ वाहतूक करण्यासाठी एक संधी निर्माण झाली आहे. तर ट्रॅक्टर जेसीबी यंत्रधारकांना पेशे कमविण्याची संधी निर्माण झाली आहे.पावसाने उघडीत दिल्याने गिरजा नदीच्या पात्रातील गाळ उपसा जोरात सुरू झाला आहे. फुलंब्री तालुक्यातील गिर जा नदीच्या पात्रात वडोद बाजार येथे कोल्हापुरी बंधारा असून या कोल्हापुरी बंधाऱ्यात मोठ्या प्रमाणात गाळ साचला आहे. आणि पावसाने उघडीत दिल्याने शेतकरी या गिरजा नदीच्या पात्रातून गाळ वाहतूक करताना करत आहे. जेसीबी यंत्राच्या साह्याने गिरजा नदीच्या पात्रातून गाळ ट्रॅक्टरद्वारे वाहतूक केली जात आहे.पावसाने उघडीत दिल्याने. वडोद बाजार येथील शेतकरी गाळ वाहतूकीसाठी सरसावले त्यात गाळ वाहून नेत आहे पावसाने उघडीत दिल्याने ट्रॅक्टर धारकांना व जेसीबी धारकांना एक उद्योग निर्माण झाला आहे.

# पुष्पा पोडे यांना फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** आरोग्य क्षेत्रात निःस्वार्थवृत्तीने सेवा देणाऱ्या आणि शासनाच्या आरोग्य योजनांचा लाभ सर्व स्तरावर पोहोचविणाऱ्या सर्वोत्कृष्ट परिचारिका आणि परिचारक यांचा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्कार प्रदान करून गौरव करण्यात आला. यात चंद्रपूरच्या पुष्पा श्रावण पोडे यांना नवी दिल्ली येथे राष्ट्रपतीच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्यावतीने आज राष्ट्रपती भवन येथे राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडविया, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री एस.पी. सिंग बघेल, विभागाचे सचिव राजेश भुषण यांच्यासह वरिष्ठ अधिकारी वर्ग, आरोग्य क्षेत्रात काम करणारे व्यक्ती उपस्थित होते. वर्ष २०२३ मध्ये मिळालेल्या पुरस्कारांमध्ये राज्यातून चंद्रपूर जिल्ह्यातील जिल्हा रूग्णालयाच्या सार्वजनिक आरोग्य परिचारिका पुष्पा श्रावण पोडे यांचा समावेश आहे.पुष्पा श्रावण पोडे चंद्रपूर जिल्ह्याच्या जिल्हा रूग्णालयात सार्वजनिक आरोग्य परिचारिका म्हणून मागील २१ वर्षांपासून कार्यरत आहेत. गडचिरोलीच्या नक्षलग्रस्त भागात त्यांनी पाच वर्ष सेवा दिली असून त्यांच्या कामाप्रती अंत्यत वचनबद्ध व मेहनती परिचारिका म्हणून त्या लोकप्रिय आहेत. श्रीमती पोडे यांनी लक्ष्यपूर्तीसाठी सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांमध्ये सक्रीय सहभाग नोंदविला आहे. श्रीमती पोडे यांनी दिलेल्या आरोग्य सेवेतील लक्षणीय योगदानाबद्दल त्यांना स्थानिक पातळीवर अनेक पुरस्कारांनी सन्मानित केलेले आहे. वर्ष १९७३ पासून राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्कारांची सुरूवात करण्यात आलेली आहे. आतापर्यंत एकूण ६१४ परिचारिका आणि परिचारक यांना त्यांच्या उत्कृष्ट सेवेसाठी पुरस्कार प्रदान करण्यात आलेले आहेत.

# वेश्या व्यवसाय चालविणाऱ्या आरोपीस म्हैसमाळ येथे अटक

## 63 हजार 570 रुपयांचा मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील म्हैसमाळ येथे दामीनी आणि अनैतिक मानवीय वाहतूक प्रतिबंधक पथकाने संयुक्त कारवाई करत येथील हॉटेल रवी लॉज या ठिकाणी धाड टाकत हॉटेलच्या नावाखाली वेश्या व्यवसाय चालविणाऱ्याला अटक केली आहे. सदरीलची कारवाई ग्रामीण पोलीस अधिक्षक मनिष कलवानिया यांच्या मार्गदर्शनाखाली दामिनी पथकाच्या सपोनि आरती जाधव आणि अनैतिक मानवीय वाहतूक प्रतिबंधक पथकाचे सपोनि सुदाम शिरसाठ यांनी पोलीस हवालदार अरूण धुरंधरे, भागीरथ आहेर, गोपाल पाटील, पोलीस अंमलदार श्रीकांत दांडगे, महिला पोलीस अंमलदार सीता ढाकणे यांनी म्हैसमाळ खुलताबाद रोडवरील कारभार देवका जाधव याच्या मालकीची हॉटेल रवि धाबा लॉजिंग ॲन्ड बोर्डींग येथे पीटा अन्वये रेड करून वेश्याव्यवसाय चालविणारा आरोपी नामे कारभारी देवका जाधव, रा म्हैसमाळ, ता. खुलताबाद, दोन पीडित महिलांची सुटका केली असून एकूण 63,570/- रू रकमेचा मुद्देमाल (ज्यामधे मोबाईल, निरोध पाकीटे, रोख रक्कम) ताब्यात घेतले असून पोस्टे खुलताबाद येथे सदरबाबत फिर्याद देउन असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.







# महाराष्ट्र विकास समितीची पत्रकार परिषद

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** संध्याच्या होत असलेल्या राजकारणामध्ये लोकशाहीची घराणेशाही निर्माण करून सामान्य जनतेला भ्रमित करून स्वतःच्या फायद्यासाठी निवडणूक लढणाऱ्या अनेक पक्ष संदर्भात कित्तेक वर्षांपासून होत असलेल्या घडामोडी बदलण्यासाठी महाराष्ट्र विकास समिती यांच्यातर्फे पत्रकार परिषद घेऊन प्रबोधन करण्यात आले. सर्व निवडणुकांमध्ये सहभागी होऊन जात-पात हा देश घातकी विचार मिटवण्यासाठी संभाजीनगर येथे लोकशाही बचाव मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात अनेक महत्त्वाचे मुद्दे आहेत त्यापैकी देश कर्जमुक्त कसे होईल लोकसंख्या नियंत्रित कशी होईल हे महत्त्वाचे मुद्दे असणार आहेत या ठिकाणी समितीचे अध्यक्ष यांनी सांगितले की या देशावर 102 हजार कोटी कर्ज आहे हे कर्ज नाही फेडले तर भारताची सुद्धा पाकिस्तान सारखी अवस्था होईल. सत्ताधारी मंत्र्यांनी काळ व सीमित वेळेचं भान न ठेवता सत्ता एक तासाची का होईना 100 वर्षाचा विचार केला पाहिजे. सध्या तात्पुरता असणारे खुर्चीवर बसणारे स्वतःच्या फायदा पळू पाहताय असा या पत्रकार परिषदेत आरोपही करण्यात आला. अनेक सुशिक्षित लोक राजकारणापासून लांब जात आहेत त्यामुळेही नुकसान होते. देव, धर्म, जात, पंत भाषा प्रांतभाषा ह्या विविध गोष्टी बाजूला ठेवून राजकारण केले पाहिजे असेही या ठिकाणी सांगितले. आज प्रत्येक शासकीय विभागात देवाचे फोटो लावले जातात हेही बंद केले पाहिजे कारण या देशात 18 पगड जातीचे लोक राहतात प्रत्येक व्यक्ती एकाच देवाला मानत नाही असे अण्णा रावजी पाटील यांनी सांगितले. व जोपर्यंत ईव्हीएम मशीन आहे तोपर्यंत लबाड सत्ताधाऱ्यांना कुठलीही भीती नाही कारण त्यांना खऱ्या लोकांच्या मताची गरज नाही असे ट्रोल करण्यात आले. व शेवट त्यांनी एक संदेश दिला की नागरिकांनी नुकते दारू पैशांसाठी मत देऊ नये नाहीतर पुढे लोकशाहीसाठी खूप घातक राहील महाराष्ट्र विकास समिती अध्यक्ष यांनी सांगितले.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर